| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २८८ वा | शनिवार दिनांक ३१ जानेवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### बोकड, शेळी व पिल्लूची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दत्तात्रय देविदास मुळे, वय ५३ वर्षे, रा. मुळेवाडी ता.जि. धाराशिव यांचे अंदाजे २२,००० किंमतीचे एक बोकड, शेळी व एक पिल्लु हे दि.२९.०१.२०२६ रोजी ०४.०० वा. सु. दत्तात्रय मुळे यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दत्तात्रय मुळे यांनी दि.२९.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गौतम रा. उळुप ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.२९.०१.२०२६ रोजी १८.१० वा. सु.आपल्या त्रिमुर्ती किराणा न्डजनरल स्टोअर्स दुकानात उळुप येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विमल पान मसाला, राजनिवास पान मसाला, आर एम डी पान मसाला, व्ही-१ तंबाखु असा एकुण ४,२९८ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला भुम पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या. सं. कलम- १२३, २७४, २७५, सह अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम २६(२) (ळ) (२)(ळीं),२७ (३) (डी),२७३) (इ) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### छायाचित्र व्हायरल करण्याचे धमकी देवून व आदि कारणाने केला लैंगिक अत्याचार

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील ३६ वर्षीय महिला जुलै २०२४ ते दि.२५.०१.२०२६ रोजी हिस गावातील एका तरुणाने आर्थिक व्यवहाराचे कारणावरुन व छायाचित्र व्हायरल करण्याचे धमकी देवून तसेच पतीला मारण्याची धमकी देवून वारंवार तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. त्यानंतर सदर छायाचित्र हे पिडीतेच्या मुलीचे इस्टा आकाउंटवापरुन शोशल मिडीयावर प्रसारीत केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२९.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन गुन्हा नोंदवला आहे.

### छायाचित्र प्रसिद्ध करतो म्हणून शेड मध्ये केला लैंगिक अत्याचार

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील २३ वर्षीय मुलगी गावातील एका तरुणाने नमुद तरुणी ही अंघोळ करत असतानाचे केलेले छायाचित्र व्हायरल करण्याची धमकी देवून आपल्या शेतातील शेडमध्ये डांबून ठेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२९.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं.कलम-११५(२),१२७(६), ३५१(३), ७१, ७८ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## ‘लेक वाचवा,लेक वाढवा,लेक घडवा’

# मुलीच्या जन्मासाठी लढा देणाऱ्यांना शासनाकडून बक्षीस योजना




धाराशिव (जिमाका) मुलीच्या जन्माचे स्वागत करणारा आणि समाजात समतेचा संदेश देणारा ‘लेक वाचवा,लेक वाढवा,लेक घडवा’ हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरावा,यासाठी शासन विविध पातळ्यांवर प्रयत्न करत आहे. स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या पी.सी.पी.एन.डी. टी. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी राज्य शासनामार्फत ‘खबरी योजना’ राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत पी.सी.पी.एन.डी. टी.कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या तसेच गर्भलिंग निदान करणाऱ्या व्यक्ती,रुग्णालये किंवा केंद्रांविषयी विश्वासार्ह माहिती देणाऱ्या नागरिकास,या माहितीची खातरजमा करून त्या अनुषंगाने खटला दाखल झाल्यास राज्य शासनामार्फत रुपये १,००,००० (एक लाख रुपये) बक्षीस देण्यात येणार आहे.विशेष म्हणजे,माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार आहे.

मुलगी म्हणजे ओझे नसून कुटुंबाची आणि समाजाची शक्ती आहे.शिक्षण,आरोग्य, कर्तृत्व आणि संस्कारांच्या माध्यमातून मुली समाजाला दिशा देतात.मात्र काही ठिकाणी अजूनही गर्भलिंग निदानासारख्या अमानवी प्रथांमुळे मुलींचा जन्म थांबवण्याचे प्रयत्न होत असल्याचे चित्र आहे.अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी प्रत्येक जागरूक नागरिकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.

गर्भलिंग निदानाबाबत माहिती देण्यासाठी नागरिकांनी ग्रामीण रुग्णालय,उपजिल्हा रुग्णालय किंवा जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय,धाराशिव येथे संपर्क साधावा.तसेच तक्रार नोंदविण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक १८००२३३४४७५ किंवा १०४ यांचा वापर करता येईल. याशिवाय अधिक माहितीसाठी amchimulgimaha.in या संकेतस्थळाला भेट देता येईल.

मुलगी वाचवणे म्हणजे भविष्यातील सशक्त समाजाची पायाभरणी होय. त्यामुळे ‘लेक वाचवा,लेक वाढवा,लेक घडवा’ हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता,प्रत्येकाच्या कृतीतून साकार होणे आवश्यक आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हा माहिती कार्यालयात भावपूर्ण श्रद्धांजली




धाराशिव,दि.२९ जानेवारी (जिमाका) उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात दुःखद निधन झाले. घटनेच्या वृत्तानंतर २८ जानेवारी रोजी जिल्हा माहिती कार्यालय,धाराशिव येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली व्यक्त केली.त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना अजित पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदानाचा उल्लेख केला.

श्रद्धांजली कार्यक्रमास जिल्हा माहिती कार्यालयातील वरिष्ठ लिपीक नंदू पवार, कनिष्ठ लिपीक दिलीप वाठोरे,वाहन चालक मोहन कोळी,अनिल वाघमारे तसेच जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील सांख्यिकी सहायक अमोल कस्तुरे व वरिष्ठ लिपीक अतुल पवार उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी पुष्प अर्पण करून संवेदना व्यक्त केल्या.या प्रसंगी कार्यालयात शांतता पाळून वातावरण भावनिक झाले होते.

## व्हिजेएनटी,ओबीसी व एसबीसी शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ निकाली काढा : प्राचार्यांची जबाबदारी निश्चित

धाराशिव,दि.२९ जानेवारी (जिमाका) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत व्हिजेएनटी, ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता अशा विविध योजनांसाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अर्ज तात्काळ भरून महाडीबिटी प्रणालीवर सादर करावे.हे अर्ज http://mahadbtmahit.gov.in या संकेतस्थळावरून ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

सन २०२५-२६ करिता बहुतांश विद्यार्थ्यांनी महाडीबिटी प्रणालीवर शिष्यवृत्ती अर्ज भरले असून,ते अर्ज सध्या महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र अनेक महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून अद्यापपर्यंत या अर्जांची पडताळणी करून ते सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले नाहीत.

तरी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिनवर प्रलंबित असलेले व्हीजेएनटी,ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे पात्र शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ मंजुरीसाठी या कार्यालयाकडे सादर करावेत,असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. अर्ज सादर करताना शाळा सोडल्याचा दाखला (T.C.) व गुणपत्रक ही कागदपत्रे मूळ (Original) स्वरूपात असावीत, याची दक्षता घ्यावी.तसेच ज्या अर्जांमध्ये त्रुटी असतील,ते अर्ज त्रुटीपूर्तता करूनच मंजुरीसाठी सादर करावेत.

याशिवाय,ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत,अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावरून तात्काळ सूचना देण्यात याव्यात, तथापि,सद्यस्थितीत जिल्ह्यात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण १ हजार २३४ अर्ज महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे.

महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले सर्व अर्ज ३१ जानेवारी २०२६ अखेर निकाली काढणे बंधनकारक असून,आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिनवर एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही,याची दक्षता घ्यावी.तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाडीबिटी पोर्टलवर शिष्यवृत्तीसाठी नोंदणीकृत विद्यार्थी लाभापासून वंचित राहिल्यास,त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्याची राहील,असे सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण,धाराशिव यांनी कळविले आहे.

## हद्दवाढ भागासाठी होणार नवीन स्मशानभूमीची सोय: माजी सभापती विजय गंगणे यांचा पुढाकार



तुळजापूर (प्रतिनिधी)- शेख फरीद नजीक नवीन स्मशानभूमी साठी जागेचा शोध घेण्यात येत असून बाजार समितीचे माजी सभापती विजय गंगणे यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. नवीन स्मशानभूमीमुळे पापनाश नगर, विवेकानंद नगर, एसटी कॉलनी, लोहिया नगरसह हद्दवाढ भागाला फायदा होणार आहे.

शहराचा वेगाने विस्तारा होत असतानाच स्मशानभूमीचा प्रश्न गंभीर होत आहे. हद्दवाढ भागातील नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी ०२ ते ०३ किलोमीटर चा फेरा पडत आहे. यामुळे हद्दवाढ भागातून स्मशानभूमीची मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर बाजार समितीचे माजी सभापती विजय गंगणे यांनी शेख फरीद नजीक सर्व्हे नंबर २१५ मधील जागेची स्मशानभूमी साठी पाहणी केली आहे. या ठिकाणी विद्युत दाहिनी सह सर्व सोयींनी युक्त अत्याधुनिक स्मशानभूमी बांधण्यात येणार असल्याचे गंगणे यांनी स्पष्ट केले आहे. नवीन स्मशानभूमी मुळे पापनास नगर, विवेकानंद नगर, एसटी कॉलनी, लोहिया नगरसह मस्के प्लॉटींग, हेलिपॅड, पुजारी नगर, लातूर रोड आदी हद्दवाढ भागातील नागरिकांना फायदा होणार आहे.

हद्दवाढ भागासाठी स्मशानभूमीची गरज शहरात घाटशीळ रोड स्मशानभूमी, मातंग नगर येथील स्मशानभूमी व आपसिंगा रोड वरील मोतीझरा स्मशानभूमी अशा ०३ स्मशानभूमी आहेत. मात्र शहराचा वेगाने होत असलेला विस्तार व वाढती लोकसंख्या पाहता हद्दवाढ भागासाठी स्मशानभूमी ची गरज व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर गंगणे यांनी घेतलेल्या पुढाकाराचे स्वागत करण्यात येत आहे.

# हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमात पुस्तिकांचे वाण देऊन जिजाऊ- सावित्रीमाईंच्या विचारांचा जागर



उमरगा(प्रतिनिधी)-स्त्री-मुक्तीची सावित्रीमाई अन् स्वराज्य निर्मात्या, प्रेरणास्त्रोत राजमाता जिजाऊ तसेच विवेकवादी, विज्ञाननिष्ठ व समाजवादी स्वामी विवेकानंद यांचा जन्मोत्सव देशभर साजरा केला जातो. या महामानवांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी उमरगा-लोहारा परिसरातील शाळा व महाविद्यालयांतून सावित्रीमाई, जिजाऊ व स्वामी विवेकानंदाच्या कार्य विचारांचा जागर करताना हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांत जिजाऊ सावित्रीमाई, विवेकानंद यांच्यावरील पुस्तिका वाण म्हणून लूटण्याचा उपक्रम राबवण्यात येत आहे.

प्रा. श्यामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालयाच्या वतीने प्रतिवर्षी हा उपक्रम राबवण्यात येतो. या अनोख्या उपक्रमाची संकल्पना ॲड. शीतल चव्हाण यांनी मांडली. या उपक्रमांतर्गत मकरसंक्रांती ते रथसप्तमी दरम्यान चालणाऱ्या हळदी-कुंकवाचे कार्यक्रमात ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनच्या महिला विंगमार्फत न्याय्य स्वराज्याच्या शिल्पकार -राजमाता जिजाऊ या दर्शना पवार लिखित व विवेकवादी, विज्ञानवादी समाजवादी विवेकानंद लिखित डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर पुस्तिकेच्या प्रतींचे वाण म्हणून वाटप केरण्यात आले होते. यंदा या उपक्रमाचे अंतर्गत हळदी-कुंकवाचा कार्यक्रम बलसूर श्री. दत्त मंदिर अन् प्रा. श्यामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालयाच्या शहर शाखेत आयोजित करण्यात आला होता. बलसूर व उमरगा येथील हळदी-कुंकू कार्यक्रमात शंभराहून अधिक महिलांनी सहभाग नोंदवला. या उपक्रमात मातोश्री शांताबाई चव्हाण, विजया गावकरे यांच्यासह फाउंडेशनच्या महिला विंगच्या ॲड. अर्चना जाधव, शबाना शेख-उडचणे, ज्योतीताई माने, बबीता मदने, प्रीती चव्हाण, अनुराधा पाटील, फरीन मुजावर, परवीन मुजावर, संध्या घोडके, कविता साळी यांनी सहभाग घेतला. जयश्री शिंदे लिखित स्त्री मुक्तीची प्रणेती- सावित्रीमाई या पुस्तिका मकरसंक्रांतीचे वाण म्हणून वाटण्यात आल्या. सर्व महिलांना हळदी-कुंकू, तीळ-गुळ व पुस्तिकांचे वाण भेट म्हणून देण्यात आले. हा उपक्रम फक्त सौभाग्यवती व हिंदू महिलांपुरता मर्यादित न ठेवता एकल, विधवा व मुस्लिम महिलांना यात सहभागी करून घेत पुस्तिकांचे वाण देण्यात आले. वाण देण्यातून महिलांमध्ये विचारांचा जागर करमण्यात आला.

## उमरग्यातील कवठा सेवाग्राम येथे आठ ते नऊ फेब्रुवारीला होणाऱ्या शिक्षण मेळ्याची तयारी अंतिम टप्प्यात

उमरगा ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेचे गुरुकुल पद्धतीचे शिक्षण मिळावे यासाठी तालुक्यातील कवठा येथील सेवाग्राम येथे दि.८ व ९ फेब्रुवारी रोजी शिक्षणाचा कुंभमेळा भरवण्यात येणार आहे.

ज्येष्ठ समाजसेवक विनायकराव पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ऋषि मुनींच्या काळातील गुरुकुल पद्धतीचे उत्कृष्ट शिक्षण मिळावे यासाठी गरीब कि पाठशाला संकल्पांतर्गत विविध शैक्षणिक उपक्रम हाती घेतले आहेत. पाच जानेवारीला कवठा सेवाग्राममध्ये शैक्षणिक कुंभमेळ्याचे भूमिपूजन करण्यात आले. गेल्या वीस दिवसांपासून फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या शैक्षणिक कुंभमेळ्याची तयारी सुरू आहे. दि.८ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणाऱ्या शैक्षणिक कुंभमेळ्याची पुजा ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांच्या हस्ते होणार आहे. या शिक्षणाच्या कुंभमेळ्यासाठी सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहून गुरुकुल शिक्षण पद्धतीचा अनुभव घ्यावा असे आवाहन पाटील यांनी केले.

गुरुकुल शिक्षण पद्धतीचा अनुभव मिळणार शैक्षणिक कुंभमेळ्याचे आयोजन ३० ते ३१ जानेवारीला करण्याचे निश्चित झाले होते. मात्र सद्या सुरु असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीमुळे जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या विनंती वरून सदरचा कुंभमेळा दि.८ व ९ फेब्रुवारी रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आल्याची माहिती संयोजक विनायकराव पाटील यांनी दिली.

शिक्षणाच्या कुंभमेळ्यासाठी शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहून प्राचीन काळातील ऋषि मुनींचे गुरुकुल शिक्षण पद्धतीचा अनुभव घ्यावा असे आवाहन श्री पाटील यांनी केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राष्ट्रवादीला पुढील निर्णय तातडीने घ्यावे लागेल

राष्ट्रवादीचे अजित पवार यांच्या आकस्मित निधनाने पक्षात मोठी पोकळी निर्माण होणे स्वाभाविक आहे. दादांचे राज्यात कार्य मोठे होते. जेष्ठ नेते शरद पवार यांच्यानंतर राष्ट्रवादीत दमदार नेता अजित पवार हे समजले जात होते. अजित पवार यांचे असे अकाली निधन होईल असे कोणालाही स्वप्नात वाटले नव्हते. त्यांची जी काम करण्याची कार्यशैली ही लोकप्रियता वाढविणारी होती. अनेक खाते सांभाळली असल्याने दिर्घ अनुभव त्यांच्या पाठीशी होता. बारामती मतदार संघात त्यांचे मोठे विचाराचे जाळे होते. त्यांनी ते मजबुत गुंफले होते. वास्तविक कोणाचे कधी मृत्यू येईल हे सांगता येत नाही. मरण तर अटळ असते. ते कोणीही रोखू शकत नाही. असे जरी असले तरी दादाचे मरण एवढे भयावह असेल असे वाटले नव्हते. वेदानादायक मृत्यू आल्याने सर्वांना वाईट वाटणे स्वाभाविक आहे. या जागात अनेकजन येतात व जातात मात्र त्यांनी दाखविलेला मार्ग, त्यांच्या अंगी असणारे गुणाचा विचार केला पाहिजे. ते उंच शिखरावर कसे पोंहचले. त्यांच्या अंगी असणाऱ्या जनसेवेचा गुण अंगीकारले पाहिजे त्याच प्रमाणे मतदार संघात लोकप्रिय होते. प्रत्येक कार्यकर्त्याची ओळख होती. नावे घेवून ते भरसभेत हाक मारत होते. प्रत्येक कार्यकर्त्यांची ओळख असल्याने त्यांचा किती मोठा संपर्क जनतेशी होता हे उघड होते. जनतेचे किती प्रेम होते हे त्यांच्या अंत्यविधी दिवशी जमलेल्या संख्येवरून सहज लक्षात येते. महाप्रचंड असा जनसमुदाय जमला होता. अनेक दिग्गजांची हजेरी दिसून आली. त्यामुळे त्यांची लोकप्रियता अफाट होती हे उघड दिसून येते. वास्तविक अजित पवार हे त्यांचे काका शरद पवारांना देश ओळखतो असे जेष्ठ नेत्यांचे पुतणे होते. त्यामुळे राजकारणातील बारकावे त्यांना कळाले होते. अनुभवाच्या जोरावर त्यांनी मोठी मजल मारली होती. त्यांच्या अचानक जाण्याने अनेक समस्या निर्माण होणार आहेत. ते राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा होते. त्यांच्या पश्चात कोणाकडे पक्षाची धुरा द्यावी जो पक्ष वाढवेल? दुसरी बाब म्हणजे राज्याचे उपमुख्यमंत्रीपद दादाच्या कुटुंबियापैकी कोणाकडे द्यावे. सर्वात महत्त्वाचे पक्ष संघटन शक्ती मजबुत ठेवणारा असा नेता हवा. या दुःखातून त्यांच्या पत्नी लवकर बाहेर येतील असे वाटत नाही. दोन मुले असले तरी प्रत्यक्षात त्यांचा राजकारणाशी संबंध नव्हता. पक्षीय राजकारणात त्यांना पदही नव्हती. केवळ मुले आहेत यापेक्षा ते राजकारणात सक्रिय आहेत असे नाही. त्यामुळे केवळ त्यांची पत्नीस उपमुख्यमंत्रीपद द्यावे व त्यांनी पक्षाची धुरा सांभाळावी अशी कार्यकर्त्याची ईच्छा दिसून येते. यदा कदाचित त्यांना उपमुख्यमंत्री ही बनवितील. त्यामुळे राजकारणात काही निर्णय तातडीने घ्यावे लागतात. असे असले तरी पवार परिवारावर मोठे दुःख कोसळले आहे. जेष्ठ नेते शरद पवार यांना सुद्धा दुःख मोठे झाले आहे हे त्यांच्या चेहऱ्यावरून सहज लक्षात येत होते. अजित पवार जे होते ते त्यांच्या काकामुळे होते हे कोठेतरी मान्यच केले पाहिजे. त्यामुळे राज्यात पुन्हा राष्ट्रवादीची ताकद वाढवायाची झाली तर मजबुत अशा व्यक्तीच्या हाती पक्ष द्यावा लागेल. नसता काका-पुतण्यात जे एक होण्याचे काही ठरले असेल तर ते व्हावे लागेल. दादा सारखा मजबुत असा व्यक्ती सध्यातरी दिसून येत नाही. त्यामुळे विचारपुर्वक राष्ट्रवादीला निर्णय घ्यावा लागणार आहे. आता पुढील वाटचाल ठरविण्याची घाई केली पाहिजे. काही झाले तरी आगामी काळात पक्ष वाढीसाठी किंवा पक्ष एकत्र होण्याकडे विचार केला पाहिजे. तरच पुन्हा जोमाने राष्ट्रवादी दिसून येणार आहे. अजित पवार यांचे एक पर्व होते ते आता त्यांच्या जाण्याने संपले असले तरी त्यांचा वारसाने आता दादाची धुरा हाती घ्यावी लागणार आहे. काही झाले तरी तातडीने निर्णय घ्यावे लागतील. शरद पवार यांची कन्या खा. सुप्रिया सुळे यांची भुमिका आता महत्वाची ठरणारी आहे. दादाच्या अंत्यविधीच्यावेळी त्या रडत बसल्या नाहीत तर मनात मोठे दुःख लपवून दादा प्रेमींना समजुत घालताना दिसल्या. याचा अर्थ आगामी काळात त्यांना सुद्धा सक्रिय व्हावे लागेल. राजकारणात प्रवाहाच्या विरोधात जाता येत नाही. सर्वांना सोबत घेवुन एका विचाराने वाटचाल करावी लागते. शरद पवार जसे दमदार राजकारणी आहेत तसे गुण असले पाहिजे. संयम असला पाहिजे. असे जरी इतरांना वाटत असले तरी स्वभावाला औषध नसते तसे दादाचे होते. त्यांचा स्वभावच तसा होता तर त्याला कोणीही काही करू शकत नव्हते. मुळात दादांना हे सर्ववेळेवर व्हावे असे वाटत होते. ते वेळेचे पाबंद होते. काम चुकारपना अजिबात जमत नव्हता. त्यांच्या विचाराचे व स्वभावाचे इतर भेटतीलच असे नाही. त्यामुळे त्यांची जागा कोणाला द्यावी. कोण घेईल, सक्षम अशा व्यक्तीकडे धुरा देणे उचित ठरणारे आहे. काही पक्षातील जबाबदार व्यक्तीने दोन राष्ट्रवादी एकत्र येणार असे म्हटले होते. जे जर योग्य असेल तर मोठा गट शरद पवार यांना मिळणार आहे. शरद पवार हे महाविकास आघाडीच्या बाजूने आहेत. पुढे चालून आज जे दादाचे आमदार आहेत. ते दोन्ही राष्ट्रवादी एक झाल्यास कोणाकडे झुकले जातील हे सांगता येत नाही. त्यामुळे हा मोठा पेच निर्माण होवू शकतो. अजित पवार हे महायुतीत होते तर शरद पवार महाविकास आघाडीत आहेत. असे राजकारण असल्याने आगामी काळात राज्यात काय होईल हे सांगता येत नाही. आगामी काळात उलथापालट होण्याची शक्याता आहे. त्यामुळे सर्व आतापासून सावध पावले पडली पाहिजेत. अजित पवार यांच्या कार्यकाळात काही तरी राजकिय घडामोड शिजल्याची शक्यता नाकारात येत नाही. जी घटना घडली त्यामुळे त्यांच्या जागी त्यांची पत्नीस पद दिले तरच सत्ताधाऱ्यास योग्य ठरणार आहे. राज्यात दुसरे उपमुख्यमंत्री समाधानी आहेतच असे नाही. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत जे घडले ते समाधान कारक नव्हते. त्यामुळे आगामी काळात दादा यांच्या आकस्मित निधनाने मोठा पेच निर्माण होवू शकतो. सावध भुमिका घेवुन सर्वांना वाटचाल करावी लागेल. दादानंतर मजबुत अशा व्यक्तीच्या हाती धुरा देणे उचित ठरणारे आहे. त्याच प्रमाणे दादांच्या पत्नीसह दादाचे निष्ठावंतास लवकरच योग्य निर्णय घ्यावा लागणार आहे.

# 'लातूर जिल्हा परिषद : ग्रामविकासाचे उर्जाकेंद्र आणि महाराष्ट्राचे 'रोल मॉडेल'





**लातूर जिल्हा परिषदेने खेड्यांकडे चला हा मंत्र कृतीत उतरवत महाराष्ट्रात विकासाचा नवा आदर्श ठेवला आहे. सहकार महर्षी दिलीपराव देशमुखांचे ११ महिन्यांचे नियोजन, अमित देशमुखांनी बळकट केलेली आरोग्य व ग्रामीण अर्थव्यवस्था आणि धिरज देशमुखांची सुंदर शाळा ही आधुनिक दृष्टी, या त्रिगुणधारेमुळे जिल्ह्याचा कायापालट झाला. तीन पिढ्यांच्या सातत्यपूर्ण नेतृत्वामुळे लातूर आज लोकशाही विकेंद्रीकरणाचे आणि शाश्वत प्रगतीचे सशक्त केंद्र बनले आहे.**

भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात सत्तेचे विकेंद्रीकरण हाच विकासाचा खरा मार्ग आहे. ''खेड्यांकडे चला'' हा महात्मा गांधींचा मंत्र लातूर जिल्हा परिषदेने प्रत्यक्ष कृतीत उतरवला आहे. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण प्रगतीचा कणा असलेल्या या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकनेते विलासराव देशमुख यांच्या दूरदृष्टीतून विकासाचे सुवर्णयुग साकारले. हाच वारसा सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, आमदार अमित देशमुख आणि माजी आमदार धिरज देशमुख यांनी आपल्या नाविन्यपूर्ण संकल्पनांनी अधिक समृद्ध केला आहे. एकेकाळी पिछाडीवर असलेली लातूर जिल्हा परिषद आज राज्यासाठी विकासाचे रोल मॉडेल ठरली आहे.

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख : शिस्तबद्ध नियोजनाचे शिल्पकार

स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रशासकीय शिस्त आणि आधुनिकतेची जोड देण्याचे ऐतिहासिक कार्य दिलीपराव देशमुख यांनी १९९२ ते १९९७ या काळात अध्यक्ष म्हणून केले.

अकरा महिन्यांचे नियोजन: लातूर जिल्हा परीषद अंतर्गत मार्च महिन्यातील घाईघाईने होणारी निकृष्ट कामे थांबवण्यासाठी त्यांनी अकरा महिन्यांचे नियोजन ही संकल्पना राबवली. ''फेब्रुवारीपर्यंत कामे पूर्ण करा आणि मार्चमध्ये हिशोब द्या,'' या त्यांच्या शिस्तीमुळे कामाचा दर्जा सुधारला आणि लातूर जिल्हा परिषद राज्यात प्रथम क्रमांकावर पोहोचली.

जलक्रांती: लातूर जिल्हयात पाणी ही समस्या भेडसावते याकरीता गाव तिथे शेततळे आणि जलहौद निर्मितीवर त्यांनी भर दिला. बाष्पीभवन रोखण्यासाठी पाण्याचे साठे पॉलिथिनने झाकण्याची त्यांची अभिनव कल्पना आजही दिशादर्शक ठरते. त्यांच्या काळात उभारलेले २०७ कोल्हापुरी बंधारे जिल्ह्याच्या सिंचनाचा आजही मुख्य आधार आहेत.

भूकंपग्रस्तांसाठी सामाजिक क्रांती: १९९३ च्या किल्लारी भूकंपाच्या काळात त्यांनी केवळ प्रशासक म्हणून नाही, तर एक संवेदनशील नेता म्हणून काम केले. भूकंपग्रस्त तरुणांना सरकारी नोकरीत २ टक्के आरक्षण मिळावे म्हणून आदरणीय विलासराव देशमुख यांच्याकडे पाठपुरावा केला, हा ऐतिहासिक निर्णय अनेक कुटुंबांसाठी आधारवड ठरला.

माजी मंत्री, आमदार अमित देशमुख : विकासाचा आर्थिक कणा आणि सक्षम आरोग्य व्यवस्था

लातूर जिल्हयात राजकीस स्थीरता रहावी सर्व संस्था एकाविचाराने एका दिशेने चालाव्यात यासाठी अमित देशमुख यांनी १९९७ पासून कॉंग्रेस पक्ष आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली: २०१२ व २०१७ च्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत कॉंग्रेसने घवघवीत यश मिळवले. नुकत्याच झालेल्या लातूर महानगरपालिका निवडणुकीत ७० पैकी ४७ जागा जिंकून कॉंग्रेसचा तिरंगा फडकावला आहे. त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला सहकाराची आणि उद्योगाची जोड देऊन अधिक सक्षम केले.

लोकनेते विलासराव देशमुख आणि दिलीपरावजींच्या मार्गदर्शनाखाली उभारलेल्या सहकारी संस्था आणि साखर उद्योगाला अमितजींनी आधुनिकतेची जोड दिली. आज लातूरमधील ग्रामीण अर्थव्यवस्था, व्यापार आणि बांधकाम क्षेत्रात जी मोठी उलाढाल दिसते, त्यात अमितजींच्या धोरणात्मक नेतृत्वाचा मोठा वाटा आहे. त्यांनी केवळ संस्था उभ्या केल्या नाहीत, तर त्यातून लाखो तरुणांच्या हाताला काम मिळवून दिले.

सार्वजनिक वितरण आणि आरोग्य: ''कोणीही उपाशी राहू नये'' या उद्देशाने त्यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्था (घ्क्च) मजबूत केली. आरोग्य क्षेत्रात, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सुविधा अद्ययावत करण्यासोबतच महात्मा फुले जनआरोग्य योजनेद्वारे कॅन्सर, हृदयविकार यांसारख्या दुर्धर आजारांवर गरिबांना मोफत उपचार मिळवून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला. कोरोना काळातही लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. माजी आमदार धिरज देशमुख : सुंदर गाव, सुंदर शाळा आणि आधुनिक दृष्टी



लेखक - राहुल हरिभाऊ इंगळे पाटील मोबाईल ९८९०५७७१२८

नव्या दमाचे नेतृत्व म्हणून माजी आमदार धिरज देशमुख यांनी ग्रामविकासाची नवी व्याख्या मांडली आहे. जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम करताना त्यांनी ग्रासरूट लेव्हलवर अनेक आदर्श निर्माण केले. शैक्षणिक आणि डिजिटल क्रांती: ''शाळा केवळ डिजिटल न होता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र असावी,'' या विचारातून त्यांनी सुंदर गाव, सुंदर शाळा ही संकल्पना राबवली. यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाची गुणवत्ता वाढून भविष्यातील सक्षम नागरिक घडत आहेत. पायाभूत सुविधा आणि सहकार: मनरेगा, पंतप्रधान ग्रामसडक योजना आणि राजीव गांधी नगरविकास योजना अशा लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी स्वतः लक्ष दिले. तसेच, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकरी आणि महिला बचत गटांना आर्थिक बळ देण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे सुरू ठेवले आहे. लातूर जिल्हा परिषदेच्या या यशस्वी वाटचालीत नेतृत्व विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सक्षम आरोग्य आणि शाश्वत पाणीपुरवठा हे मुख्य स्तंभ राहिले आहेत. लातूर जिल्हा





परीषद बहूतेक वेळा कॉंग्रेसकडे राहीली यामध्ये दिवंगत बब्रुवान काळे, मिठाराम राठोड, छाया चिगुरे, प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी अध्यक्ष पदाच्या काळात उल्लेखनीय काम केले आहे. देशमुख कुटुंबातील तीन पिढ्यांनी ग्रामविकासाचा जो वटवृक्ष उभा केला, त्यामुळेच लातूर आज राज्यासाठी मॉडेल ठरले आहे. ही जिल्हा परिषद केवळ सरकारी कार्यालय नाही, तर ती लातूरकरांच्या स्वप्नांची भागीदार आहे. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाचा हा आदर्श अखंड ठेवण्यासाठी येत्या शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदारांनी लातूरच्या सर्वांगीण विकासाला आणि लोकाभिमुख नेतृत्वाला कौल देणे ही काळाची गरज आहे. ही निवड केवळ एका लोकप्रतिनिधीची नसून, लातूरच्या उज्ज्वल भविष्याची आणि विकासाच्या भक्कम पायाची असेल.

# लेखा, कोषागारे : काल व आज

**महाराष्ट्र शासनाने वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालयाची स्थापना करून कोषागाराचे नियंत्रण संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे विभागप्रमुख या नात्याने सोपविण्यात आले.१९६२ पूर्वी जिल्हा कोषागारे वित्त विभागाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली होती आणि शासन सचिव, वित्त विभाग हे जिल्हा कोषागारांचे विभागप्रमुख होते. यापूर्वी वित्त विभागाने १ एप्रिल १९५५ पासून जुन्या मुंबई राज्यातील कोषागारे महसूल विभागाकडून आपल्या नियंत्रणाखाली आणली. भुतपूर्व हैद्राबाद राज्यातील कोषागारे ही त्या शासनाच्या वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली होती व राज्य पुनर्रचनेनंतर, दिनांक १ नोव्हेंबर १९५६ पासून ती थेट मुंबई राज्याच्या वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली आली. तथापि विदर्भातील कोषागारे ही महसूल विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली होती. ती १ जानेवारी १९५८ पासून वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली घेण्यात आली.**

राज्यातील सर्व जिल्हा कोषागारे ही संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणली. मात्र तहसीलच्या ठिकाणी असलेली उपकोषागारे महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली होती. ही उपकोषागारे संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यासाठी दिनांक १ एप्रिल १९६४ रोजी २४ उपकोषागारांचा एक गट व दिनांक १ जून १९६८ रोजी ९८ उपकोषागारांचा आणखी एक गट वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यात आला. आता राज्यातील सर्व २९० उपकोषागारे वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहेत. दि. १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालयाची स्थापना करण्यात आल्यानंतर शासनाच्या व्यवहारासंबंधीच्या लेख्यांचे काम पाहणारी सर्व जिल्हा कोषागार कार्यालये. वित्त विभागाचे कोषागार निरीक्षण पथक, अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई. संचालक, स्थानिक निधी लेखा, मुंबई यांचे कार्यालय. भांडार पडताळणी विभाग. लेखा कार्यालये (प्रशिक्षण), वित्त विभागातील दक्षता पथक शाखा इ. कार्यालये व संलग्नित शाखा या संचालनालयाच्या नियंत्रणाखाली आणल्या.

अधिदान व लेखा कार्यालय मुंबई या कार्यालयाची मुख्यालयाचे प्रदानाचे काम पार पाडण्यासाठी दिनांक १ एप्रिल १९५५ रोजी स्थापना करण्यात आली. हे काम यापूर्वी महालेखापाल, मुंबई यांच्याकडून पार पाडण्यात येत होते. लेखा प्रशिक्षण कार्यालयाकडून कोषागार लिपिकांना आणि इतर विभागातील व कार्यालयातील लेखाविषयक कामकाज पार पाडणाऱ्या लिपिकांना प्रशिक्षणांची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सध्या मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक,अमरावती येथे प्रशिक्षण वर्ग आहेत.

१ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालय स्थापन झाल्यानंतर वित्त विभागास दुय्यम असलेल्या लेखा कार्यालयातील पर्यवेक्षकीय संवर्गाची पुनर्रचना वित्त विभागाखेरीज इतर शासकीय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील लेखाविषयक बाबीचे काम पाहणारी पदे विचारात घेऊन एकत्रित राज्यासाठी वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली शासनाने फेब्रुवारी १९६५ पासून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेची स्थापना केली. यामध्ये निरनिराळ्या शासकीय विभागांमधील लेखाविषयक कामे करणाऱ्या सर्व राजपत्रित व अराजपत्रित पर्यवेक्षी पदांचा समावेश करण्यात आला. यामुळे केवळ निरनिराळ्या शासकीय विभागांमध्येच नव्हे तर मंडळे, महामंडळे, प्रकल्प, विद्यापीठे, जिल्हा परिषदा, वाणिज्यिक विभाग, स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालय इत्यादी मध्ये देखील लेखाविषयक व वित्तीय जबाबदारीची कामे करण्यासाठी पुरेशी अर्हता व अनुभव असलेले प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध होऊ शकतात. तसेच यामुळे कर्मचाऱ्याना सर्वांगीण अनुभव मिळण्याच्या दृष्टीने, त्यांची अदलाबदल करण्याची सोय उपलब्ध होते. १ फेब्रुवारी १९६५ रोजी या सेवेमध्ये एकूण ३७५ कर्मचारी होते. ही संख्या २५४० इतकी झालेली आहे.

१ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालय स्थापन झाल्यानंतर पुणे व नागपूर येथे दोन प्रादेशिक कार्यालयेही स्थापन करण्यात आली. सन १९८० नंतर महसूल विभागाप्रमाणे प्रादेशिक कार्यालयाची पुनर्रचना करुन अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोकण विभाग अशी चार प्रादेशिक कार्यालये स्थापन करण्यात आली. उपसंचालक (सध्या सहसंचालक) लेखा व कोषागारे यांना प्रादेशिक विभागप्रमुख म्हणून घोषित करण्यात आले.

### भांडार पडताळणी शाखा

लोकलेखा समितीने १९४४-४५ च्या विनियोजन लेख्यावरील लेखा अहवाल व केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक ९२८१/३३, दिनांक १६ ऑक्टोबर १९५२ अन्वये वित्त विभागाचा एक भाग म्हणून स्वतंत्र भांडार पडताळणी शाखेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १ जानेवारी १९६२ पासून स्थापना करण्यात आलेल्या लेखा व कोषागारे संचालनालयाकडे वित्त विभागाची भांडार पडताळणी शाखा विलीन करण्यात आली. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक डीएटी-१०६४/५८४/सी-१२ दिनांक १ फेब्रुवारी १९६५ अन्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा दिनांक १ फेब्रुवारी १९६५ स्थापन करण्यात आली आणि भांडार पडताळणी अधिकारी व भांडार निरीक्षक या पदांचा उक्त सेवेच्या अनुक्रम गट-ब व गट-ब (अराजपत्रित) मध्ये अंतर्भाव करण्यात आला.

भांडार पडताळणी शाखेमार्फत शासनाच्या विविध विभागीय कार्यालयाच्या ताब्यातील साठ्यांची व भांडारांची पडताळणी केली जाते.

राज्य अभिलेख देखभाल अभिकरण

केंद्र शासनाने दिनांक ०१ एप्रिल २००४ पासून लागू केलेली नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना महाराष्ट्र राज्यात लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या निर्णयास अनुसरुन दिनांक ०१ नोव्हेंबर,२००५ पासून सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक ३१ऑक्टोंबर,२००५ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले.

### व्हर्चुअल ट्रेजरी

महाराष्ट्र शासनाच्या कर व करेत्तर रकमा 'इंटरनेट बँकिंग' सुविधेचा वापर करुन करदात्यांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने भरता याव्यात, यासाठी शासन वित्त विभागाने '''शासकीय जमा लेखांकन पदध्त'' () ही प्रणाली विकसित केली आहे.

बिम्स, बील पोर्टल, सेवार्थ या प्रणालीमधून संगणीकृत देयके तयार केली जातात. पारित झालेली देयकांची रक्कम , व व ई कुबेर व्दारे संबंधित आहरण व संवितरण अधिकारी आणि लाभधारकांच्या बँक खात्यावर जमा केली जाते. तसेच निवृत्तीवेतनधारकाचे पुरवणी/मासिक निवृत्तीवेतन आणि निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरणाची रक्कम सुध्दा व ई कुबेर व्दारे सरळ त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येत आहे.

व्दारे निवृत्तीवेतन धारकांना प्रथम ओळखपत्रासाठी संदेश देणे, मासिक / पुरवणी निवृत्तीवेतन देयक कोषागारात जनरेट झाल्याबरोबर जाणे, हयात प्रमाणपत्राची संगणात नोंद घेतल्यानंतर त्वरीत निवृत्तीवेतन धारकांना हयात प्रमाणपत्राची नोंद घेतल्याचा संदेश जाणे इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. कोषवहिनी/ अर्थवाहिनी व्दारे जिल्हा निहाय जमा व खर्च, आहरण व संवितरण अधिकारी निहाय जमा व खर्च, लेखाशिर्ष निहाय जमा व खर्च, कोषागारात दाखल केलेल्या देयकाचा स्टेटस इ. अनेक प्रकारची अद्यावत माहिती मिळू शकते.

**प्रशासन :**

संचालक लेखा व कोषागारे, हे कार्यालय, मुंबई येथे कार्यरत असून त्यांच्यासमवेत दोन सहसंचालक, दोन उपसंचालक, एक सहायक संचालक आणि एक रचना व कार्यपध्दती अधिकारी आहेत. अधिदान व लेखाधिकारी मुंबई, मुख्यलेखापरिक्षक, मुंबई हे सुध्दा संचालनालयाच्या अधिनस्त असून संचालक लेखा व कोषागारे मुंबई यांचे प्रशासकीय नियंत्रण आहे. महाराष्ट्रात एकूण ३४ जिल्हा कोषगारे आणि २९० उपकोषागारे कार्यालय आहेत. नियमित संचालकाव्यतिरिक्त २९ संचालक दर्जाचे, ५४ पदे सहसंचालक संवर्गातील, १२९ पदे गट-अ (वरिष्ठ) २९७ पदे ग-अ (कनिष्ठ), ९४८ पदे ब (राजपत्रित संवर्गातील आहेत. सर्वसाधारण जिल्ह्यात महाराष्ट्र वित्त व लेखा सवंर्गातील वेगवेगळया विभागात संवर्गातील अधिकारी/ कर्मचा-यांची किमान १०० पदे कार्यरत असतात.

**(ॲड.अण्णाराव भुसणे, सेवानिवृत्त कोषागार अधिकारी)**
**राज्य संघटक: महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, मुंबई**
**अध्यक्ष, जिल्हा पेन्शनर्स असोशिएशन, लातूर**

एमपीएससी कॉर्नर | महाराष्ट्रातील व्यक्तीमत्वे

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले



एकोणविसाव्या शतकाच्या मध्यार्थात ज्या वेळी भारतासारख्या रूढीवादी परंपरा असणा-या देशात स्त्रीला समाजात ‘चूल आणि मूल’ एवढेच स्थान होते, स्त्रीला समाजात कोणताही दर्जा नव्हता अशा वेळी तिला शिक्षणाच्या माध्यमातून एक नवी दिशा, नव संजीवनी देण्याचे काम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले. पुण्यात शिक्षणाची सोय नव्हती म्हणून जोतिबांनी इ.सवी.सन १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. या शाळेत काम करण्यासाठी शिक्षिका मिळत नसल्याने जोतीरावांनी आपल्या अशिक्षित पत्नीला घरी लिहायला आणि वाचायला शिकवले. पुढे त्यांची शिक्षिका म्हणून नेमणूक केली.


सावित्रीबाईंना स्वत:चे अपत्य नव्हते पण दिनदलितांना व अनाथांना जवळ करून सावित्रीबाईंनी पोटाच्या मुलांप्रमाणे प्रेम केले. सावित्रीबाईंनी जोतिबांच्या कार्यात उत्तम साथ दिली. सर्व टीका,छळ सहन करून समाज सुधारण्याचे काम केले. जोतीबा फुले व सावित्री बाईंचे शिक्षणाचे पवित्र कार्य चालू असतांना, त्यांच्या ह्या कार्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न जोतीरावांच्या वडिलांनी केला. त्यांच्या समाज सुधारण्याच्या कार्यामुळे धर्माला काळिमा लागेल, बेचाळीस पिढया नरकात जातील असे त्यांचे समज होते. पण सावित्रीबाई आपल्या कार्यापासून डगमगल्या नाही. त्यांच्या मुलींच्या शाळेत मुलींची संख्या हळूहळू वाढू लागली. पुण्यात त्या काळात हा चर्चेचा विषय झाला होता. या कार्यामुळे समाजात सावित्रीबाईंचा दरारा निर्माण झाला होता. सावित्रीबाई जवळ विलक्षण चिकाटी व कठोरपणा होता.

संत चोखामेळा मंदिरात त्यांनी दिन-दलितांसाठी शाळा काढली. त्यांच्या या कार्याबद्दल इंग्रज सरकारने त्यांचा गौरव केला होता. असा मान आत्तापर्यंत कोणालाही मिळाला नाही. सावित्रीबाईंनी जे विचार मांडले ते त्यांनी प्रत्यक्ष कृतीत आणले. अध्यापनाचे काम करत असतांना त्यांचा मानसिक आणि काही प्रमाणात शारीरिक छळ नातेवाईकांनी, समाजाने, सनातन्यांनी केला. रस्त्यातून जात असतांना त्यांना लोकांकडून शिवीगाळ, त्यांच्या अंगावर शेणाचे गोळे भिरकावण्यात आले, घरातील कचरा त्यांच्या अंगावर टाकण्यात आला. पण त्यांना मात्र सत्काराची फुले उधळल्या सारखीच वाटत. ही सर्व कृत्य त्यांना विध्यार्थ्यांना शिकविण्यासाठीचे प्रोत्साहन असल्याचे वाटत असे. एकदा शाळेत जात असतांना चौकातील गुंडांनी सावित्रीबाईंचा रस्ता अडवून ,मुलींना आणि महार - मांगाना शिकवणे तू बंद कर नाहीतर तुझी अब्रू शाबूत राहणार नाही अशी धमकी दिली. हे ऐकताच सावित्रीबाईंनी त्याला चपराक लगावली.

सावित्रीबाई अशा संकटांना तोंड देण्यास समर्थ होत्या. दादोबा पांडुरंग तर्खडकर हे सरकारी-देशी शाळांचे पर्यवेकशक असतांना त्यांनी थोड्या वेळात शाळेने चांगली प्रगती केली हे भूषावह आहे असा शेरा दिला. त्या काळात विधवा महिलांचे केशवपन होत असे कारण विधवा स्त्री ने संन्यासिनी सारखे जीवन जगावे अशी रूढी होती. स्त्रीला अपशकुनी समजले जात असे. तिला पांढरे वस्त्र परिधान करावे लागत असे. त्यांना घरात कोंडून ठेवले जात असे हे स्त्रियांचे दुख त्यांनी जवळून पहिले होते. केशवपनाची दृष्टप्रथा नष्ट झाली पाहिजे असे त्यांना वाटे, पण लोक ऐकत नव्हते म्हणून जोतीबा आणि सावित्रीबाईंनी सर्व नाव्ह्यांची सभा बोलावली. आपण आपल्या भगिनींवर वस्तरा चालवितो हे मोठे पाप आहे याची जाणीव करून दिली. नाव्ह्यांनाही त्याची जाणिव झाली आणि त्यांनी पाठिंबा दिला.

सावित्रीबाईंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरु केले. बाल-विधवांचे दुखः त्यांनी जाणले होते, स्त्रीभ्रूण हत्याही सर्रास घडत असे म्हणून बालहत्या प्रतिबंध गृह स्थापन केले. अस्पृश्यांसाठी जोतिबांनी सार्वजनिक पाण्याचे हौद खुले केले. इ. स. १८९३ साली सत्यशोधक समाजाचे मोठे अधिवेशन सासवडला भरले होते त्याच्या अध्यक्षा सावित्रीबाई होत्या. त्यात त्यांनी आपले विचार परखडपणे मांडले. १० मार्च १८९७ रोजी पुण्यात प्लेगची साथ आली होती. दुर्दैवाने त्यांना प्लेगने घेरले आणि त्यातच या क्रांतिकारक महिलेने जगाचा निरोप घेतला.

## हिवाळ्यात हीटर चालवताना कधीही या चुका करू नका



हिवाळ्यात घर हीटर वा-परताना टाळायच्या चुका: संपूर्ण भारतात हिवाळा सुरू झाला आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी हीटर वापरणे सामान्य आहे. तथापि, त्यांचा योग्य वापर कसा करायचा हे फार कमी लोकांना माहिती आहे. या लेखात, हीटर वापरताना होणाऱ्या सामान्य चुकांबद्दल आणि त्यांचा सुरक्षितपणे वापर कसा करायचा याबद्दल जाणून घेऊया.

हिवाळ्यात पनीर का खावे? आरोग्यासाठी काय फायदे आहे, जाणून घ्या

बंद खोलीत वेंटिलेशनशिवाय हीटर चालवणे: थंड हवामानात, बरेच लोक खोली पूर्णपणे बंद करून हीटर चालू करतात. हे अत्यंत धोकादायक असू शकते कारण ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे गुदमरण्याचा धोका वाढतो.

देशातील ८ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इश-ारा, अनेक भागात बर्फवृष्टीचा इशारा

हीटरजवळ ज्वलनशील वस्तू ठेवणे: हीटरजवळ रजाई, पडदे किंवा लाकडी वस्तू साठवल्याने आग लागू शकते. हे आगीचे एक प्रमुख कारण असू शकते.

हिवाळ्यात या प्रकारे तीळ खा, तुमचे शरीर निरोगी राहील

रात्रभर हीटर चालू ठेवणे: थंडीपासून वाचण्यासाठी बरेच लोक रात्रभर हीटर चालू ठेवतात. यामुळे केवळ इलेक्ट्रिकल शॉर्ट सर्किटचा धोका वाढतोच, शिवाय खोलीतील हवाही कोरडी होते, ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.

हीटर सुरक्षितपणे आणि योग्यरित्या कसा वापरावा ?

वायुवीजन विचारात घ्या: हीटर वापरताना, खोलीत चांगली हवा खेळती असल्याची खात्री करा जेणेकरून ताजी हवा फिरेल.

कार्बन मोनोऑक्साइड डिटेक्टर वापरा: जर गॅस हीटर वापरत असाल तर कार्बन मोनोऑक्साइड डिटेक्टर बसवा. हे विषारी वायूपासून संरक्षण करण्यास मदत करते.जास्त वापर टाळा: हीटरचा जास्त वापर टाळा आणि वेळोवेळी तो बंद करा जेणेकरून खोलीतील हवा स्वच्छ राहील.

ह्युमिडिफायर वापरा:हीटर चालवल्याने खोलीतील आर्द्रता कमी होते. त्वचा आणि श्वसनाच्या समस्या टाळण्यासाठी ह्युमिडिफायर वापरा.

खोलीत रूम हीटरसोबत पाण्याची बादली ठेवणे का महत्त्वाचे आहे?

पाण्याची एक वाटी ठेवा:खोलीत पाण्याचा एक वाटी ठेवल्याने हवेतील आर्द्रता टिकून राहते आणि कोरडेपणा टाळता येतो.हिवाळ्यात अपघात टाळण्यासाठी हीटरचा योग्य वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीटर वापरताना, वायुवीजनाकडे लक्ष द्या आणि सुरक्षिततेच्या खबरदारीचे पालन करा. माहिती देऊन आणि योग्य खबरदारी घेऊन, तुम्ही स्वतःची आणि तुमच्या कुटुंबाची सुरक्षितता सुनिश्चित करू शकता.

## व्याजदर आणि जीएसटीच्या दरात



कपात झाली असली तरी खासगी गुंतवणूक आणि नागरिकांची बचत वाढली नसल्याचे अहवालात अप्रत्यक्षपणे कबूल केल्याने मोठ्या विकासदराची अपेक्षा करता येत नाही.

धान्याचे उत्पादन वाढले आहे, निर्यात वाढत आहे, भारत लवकरच जगातील तिसरी आर्थिक महासत्ता होईल; असे काही नेहमी सादर केले जाण-ारे मुद्दे अंदाजपत्रक पूर्व आर्थिक पाहणी अहव-ालात मांडले आहेत. हा अहवाल बघता देशात सर्वत्र सर्व काही आबादीआबाद आहे असे वाटते. 'रचनात्मक अडथळे आणि भू राजकीय दबाव' यांचा अर्थव्यवस्थेला धोका असल्याचे अहवालात म्हटले आहे. येथे ‘रचनात्मक’ याचा सर्जनशीलतेशी संबंध नाही, तर बंदरे, रस्ते आदी मूलभूत सुविधांचा अभाव असा त्याचा अर्थ आहे. महामार्गांची बांधणी वेगात सुरू आहे, रेल्वे मार्गांचे जाळे विस्तारत आहे व त्याचे विद्युतीकरणही ९९ टक्के झाल्याचे अह-वाल सांगत असताना गेल्या दहा वर्षांत रचनात्मक अडथळे दूर का झाले नाहीत? याविषयी अहव-ालात उल्लेख नाही. कौशल्य कार्यक्रम सरकार गेली काही वर्षे राबवत आहे, तरीही उद्योगांना आवश्यक असणार्या कुशल मनुष्यबळाची कमतरता जाणवत असल्याचे अहवालात म्हटले आहे. कृषी, वने, पशुधन, मत्स्यव्यवसाय या क्षेत्राचा विकासदर २४-२५ च्या ४.६ टक्क्यांवरून चालू वर्षी ३.१ टक्के असा कमी झाला आहे. उद्योग क्षेत्राची वाढही मंद गतीने होत असल्याचे अहवालातून दिसते. पुढील वर्षाचा विकासदर ६.८ ते ७ टक्के असा माफक राहणार असल्याचे अहवाल सांगतो.

खासगी गुंतवणूक घटली

गेल्या वर्षभरातील विविध क्षेत्रांतील घडामोडींचा आढावा घेत आगामी वर्षात देशाची आर्थिक स्थिती व दिशा काय असेल हे अंदाजपत्रकपूर्व आर्थिक पाहणी अहवालातून मांडले जाते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या प्रत्युत्तर शुल्काचा काही परिणाम झाल्याचे सरकारला मान्य करावे लागले आहे. अमेरिकेला होणारी निर्यात घटली असली तरी अन्य बाजारपेठांमध्ये ती वाढली असल्याचे अहवालात म्हटले आहे. मौल्यवान खडे व दागिने यांची अमेरिकेस होणारी निर्यात ४४.३ टक्क्यांनी घटली आहे. पश्चिम व आग्नेय आशियाई देशांत मासळी व सागरी उत्पादने, वाहनांचे सुटे भाग यांची निर्यात वाढली आहे; पण वस्त्रोद्योगाची निर्यात ६.१ टक्क्यांनी घटली आहे. चालू वर्षी एकूण निर्यात ८२५.३ अब्ज डॉलर्स होईल व हा एक उच्चांक आहे असे अहवालात म्हटले आहे; पण प्रत्यक्षात गेल्या वर्षीच्या तुलनेत निर्यातीत केवळ ०.६ टक्के वाढ झाली आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाची मोठी घसरण झाल्याने निर्यात जास्त दिसत आहे का ते त्यात स्पष्ट केलेले नाही. चालू आर्थिक वर्षात डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत ६ ते ७ टक्क्यांनी घटली आहे. ज्या क्षेत्रांत रोजगार जास्त निर्माण होतो त्यांची निर्यात घटल्याने रोजगारावर काय परिणाम झाला आहे त्याविषयी अहवालात काहीच म्हटलेले नाही. चालू आर्थिक वर्षात सरकारी खर्च किंवा गुंतवणूक सुमारे १५ लाख ४८ हजार कोटी रुपये होणे अपेक्षित आहे. त्याबद्दल सरकार स्वत:ची पाठ थोपटत आहे; पण खासगी गुंतवणूक गेल्या वर्षीच्या ६.६ लाख कोटी रुपयांवरून ४.९ लाख कोटी रुपये एवढी कमी झाली आहे. रिझर्व बँकेने व्याजदर १.२५ टक्के कमी करूनही खासगी गुंतवणूक वाढलेली नाही. अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी सरकारला खर्च करणे भाग पडत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा उत्पादकता वाढवण्यास विशेष उपयोग झालेला नाही, असे अहवालात कबूल करण्यात आले आहे. त्यावर झालेला सरकारी व खासगी खर्च फार उत्पादक ठरला नाही असा त्याचा अर्थ होतो. पर्यावरण रक्षणासाठी विकसित देशांकडून पुरेसा निधी मिळत नसल्याने अर्थव्यवस्थेवर ताण आल्याचे अहवालात म्हटले आहे. भू राजकीय स्थिती आणि जागतिक अर्थव्यवस्थेची अनिश्चित स्थिती हे धोके अहवालात नमूद करण्यात आले आहेत. म्हणूनच निर्यात वाढवून अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी 'मुक्त व्यापार करार' करण्यावर सरकार भर देत आहे. २६-२७ या वर्षात देशाचा विकास दर आतापेक्षा कमी राहील, असे सरकारच म्हणत आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधीने हा दर ६.४ टक्के राहील असे म्हटले आहे. अहवालाद्वारे सरकारने आत्मस्तुती केली असली तरी वास्तव फार आशादायक नाही असे जाणवते.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



**साग**-सागात सर्व प्रकारच्या त्वचे करता लाभदायक न्यूट्रीशन असतात आणि मजेदार गोष्ट म्हणजे तुमचे शरीर त्या सर्व न्यूट्रीशन ला चमत्कारीक स्पंज प्रमाणे शोषुन घेतो. साग जसे की पालक, कोबी, ब्रोकोली आणि हिरवे सफरचंद निश्चितच आपण आपल्या दैनिक आहारात याचा समावेश करायला हवा. डाळींबतुम्ही डाळींब खाता? बरेच जण नाही खात पण त्यांना हे माहीत नाही की डाळींबात बरेचसे अँटीऑक्सीडेंट असतात जे आपल्याला दुस-या फळांमध्ये मिळत नाही. जेव्हा स्वस्थ त्वचेबद्दल आपण बोलतो तेव्हा कदापीही आपल्याला डाळींबाला विसरून चालणार नाही.

## २ Joke विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षांचे आहेत.

राजू - माझ्याच वयाचे आहेत.

बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.

राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message संदेश



Santa’s Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.**- डॉन प्याट**


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रिय:।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




# मुखर्जींचा बॉक्स ऑफिसवर धमाका!




## केरळ स्टोरी २ चा टिझर यावेळी अधिक गडद; हिंदू मुलींवर निशाणा....

मुंबई : आजपर्यंत विपुल अमृतलाल शाह यांचे अनेक देशभक्तीपर सिनेमे किंवा सामाजिक प्रश्नांना हात घालणारे सिनेमे आपण पाहत आलोय. द केरळ स्टोरी हा त्यांच्या कारकिर्दीमधला सर्वात जास्त कमाई केलेला लोकप्रिय चित्रपट ठरला. आता त्याच सिनेमाचा दु-सरा भाग आपल्या भेटीला येतोय, तोही अधिक भीतीदायक आणि अनेक कथा उलघडणारा असणार आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या कामाख्या नारायण सिंह दिग्दर्शित या चित्रपटात उल्का गुप्ता, ऐश्वर्या ओझा आणि आदिती भाटिया यांनी तीन हिंदू मुलींच्या महत्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत.

टिझर विषयी-तीन मुस्लिम मुलांच्या प्रेमात पाडल्यानंतर त्यांचे जीवन कसे भयानक वळण घेते आणि हळूहळू धार्मिक धर्मांतराचा मुद्दा कसा उलघडत जातो हे या चित्रपटात आपल्याला पाहायला मिळणार आहे. कस प्रेमाला शस्त्र बनवलं जात, ओळख हिरावून घेतली जाते, स्त्री म्हणून मर्यादा लादल्या जातात, श्रद्धेला संघर्षाचं मैदान कसं बनवलं जात. याचे भयानक आणि गडद वर्णन या टिझर मध्ये आपल्याला पाहायला मिळते आहे.

केरळ स्टोरी केव्हा प्रदर्शित होणार

केरळ स्टोरी च्या जबरदस्त कथेनंतर देशभरातील प्रेक्षकानं हलवून टाकले. कामाख्या नारायण सिंह दिग्दर्शित ' द केरळ स्टोरी २ ची निर्मिती विपुल अमृतलाल शाह यांनी केली आहे, तर आशिष ए.शाह. सनशाईन पिकचर्सच्या सोबत सह निर्मिती करत आहेत. हा चित्रपट २७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.


मुंबई : बॉलीवूडची दमदार अभिनेत्री राणी मुखर्जीचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'मर्दानी ३' आज ३० जानेवारी रोजी सिनेमागृहात प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. राणीच्या अभिनय कारकिर्दीला ३० वर्षे पूर्ण होत असतानाच आलेला हा चित्रपट तिच्या चाहत्यांसाठी मोठी मेजवानी ठरत आहे. 'शिवानी शिवाजी रॉय' या धाडसी पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत राणीने पुन्हा एकदा प्रेक्षकांची मने जिंकली असून सोशल मीडियावर चित्रपटाचे भरभरून कौतुक होत आहे.

'मर्दानी ३' बद्दल प्रेक्षक काय म्हणत आहेत?

सोशल मीडिया वापरासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना निर्बंध, फेसबुक-एक्सवर पोस्ट कर्मचाऱ्यांना महागात पडणार

मुंबई : राज्य शासनाचे कर्मचारी आपल्या वैयक्तिक सोशल मीडिया अकाऊंटवर गणवेशा-तील फोटो, कार्यालयाचे लोगो, पदनाम, तसेच सरकारी मालमत्तेचे फोटो किंवा ...

या चित्रपटाच्या ट्रेलरपासूनच प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती आणि आता चाहते चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहांमध्ये गर्दी करत आहेत. अनेक प्रेक्षकांनी 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वर आपले रिव्ह्यू शेअर केले असून, अनेकांनी याला 'पैसा वसूल' चित्रपट म्हटले आहे. एका युजरने राणीच्या अभिनयाचे कौतुक करताना लिहिले की, झझझ/५ चरीवररपळ३ - एक अतिशय तीव्र आणि प्रभावी क्राईम ड्रामा आहे. राणी मुखर्जीने ताकदवान आणि निर्भीड अभिनय केला असून, तिने संपूर्ण चित्रपट आपल्या




खांद्यावर पेलला आहे. जबरदस्त क्शन, खिळवून ठेवणारा उत्तरार्ध आणि भावूक क्लायमॅक्स; हा चित्रपट खरोखरच गंभीर, परिणामकारक आणि पैसा वसूल आहे.

दुसऱ्या एका चाहत्याने सविस्तर रिव्ह्यू शेअर करताना लिहिले की, मर्दानी ३ हा चित्रपट या फ्रँचायझीच्या मूळ उद्देशाशी पूर्णपणे प्रामाणिक राहतो, ज्यात वास्तववाद, नैतिक तातडी आणि गुन्हेगारी व न्यायाकडे पाहण्याचा एक निर्भीड दृष्टिकोन दिसून येतो. हा केवळ वरवरचा झगमगाट असलेला आणि साध्या मनोरंजनासाठी बनवलेला थ्रिलर चित्रपट नाही; तर हा एक अत्यंत परिणामकारक आणि भावनिकदृष्ट्या जड असा चित्रपट आहे, जो तुमचे मनोरंजन करण्यापूर्वी तुम्हाला अंतर्मुख करतो आणि अस्वस्थ करतो.

प्रेक्षकाने पुढे दिग्दर्शकाचे कौतुक करताना म्हटले की, त्यांनी एका अत्यंत समर्पक सामाजिक विषयाची तीव्रता कमी न करता तो प्रभावीपणे मांडला आहे. तसेच चित्रपटाचा उत्तरार्ध अतिशय उत्कंठावर्धक आणि खिळवून ठेवणारा असल्याचे त्यांनी नमूद केले. संबंधित ट्विटमध्ये पुढे म्हटले आहे की, राणीमुखर्जीने पुन्हा एकदा हे सिद्ध केले आहे की 'शिवानी शिवाजी रॉय' हे हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रतिष्ठित पोलीस पात्रांपैकी एक का आहे. तिने एक करारी आणि निर्भीड अभिनय सादर केला असून, त्यामध्ये कणखर निर्धार आणि भावनिक खोलीचा सुरेख संगम पाहायला मिळतो. तिची पडद्यावरील उपस्थिती (ीलीशशप िशिीशपलश) एकटीच संपूर्ण चित्रपट पेलून धरते आणि तिच्या या फ्रँचायझीमधील सर्वोत्तम कामगिरींपैकी ही एक आहे. या चित्रपटातील खलनायक हे आणखी एक वैशिष्ट्य आहे. मल्लिकाप्रसाद खरोखरच भयावह वाटली असून तिने 'मर्दानी'मधील स्मरणीय खलनायकांची परंपरा कायम ठेवली आहे. जानकीबोडीवाला यांच्यासह इतर सहकलाकारांनीही आपली भूमिका चोख बजावली असून कथेला भावनिक जोड दिली आहे.

'मर्दानी ३' बद्दल

अभिराज मिनावाला यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला आणि आदित्य चोप्रा यांच्या निर्मितीखाली तयार झालेला 'मर्दानी ३' हा 'यशराज फिल्म्स'च्या (धठऋ) मर्दानी फ्रँचायझीचा तिसरा भाग आहे. या चित्रपटात राणी मुखर्जीसोबत मल्लिका प्रसाद आणि जानकी बोडीवाला यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाबद्दल बोलताना राणी म्हणाली की, 'मर्दानी ३' हा अतिशय गडद (वरीज्ञ), घातक आणि क्रूर विषयावर आधारित चित्रपट आहे. आमचा हा चित्रपट प्रेक्षकांना कसा वाटतो आणि ते यावर काय प्रतिक्रिया देतात, हे जाणून घेण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. मला आशा आहे की प्रेक्षक या भागावरही तितकेच प्रेम करतील, जितके त्यांनी आधीच्या भागांवर केले आहे.

मर्दानी ३ चित्रपटामधील सगळे स्टारकास्ट

मर्दानी ३ मध्ये शैतान फेम जानकी बोडीवाला देखील मुख्य भूमिकेत आहे. चित्रपटाची पटकथा आयुष गुप्ता यांनी लिहिली आहे, जो धठऋ च्या द रेल्वे मॅन साठी ओळखला जातो आणि अभिराज मिनावाला दिग्दर्शित आहे. यशराज फिल्म्स बॅनरखाली आदित्य चोप्रा यांनी या प्रकल्पाची निर्मिती केली आहे. मल्लिका प्रसादच्या खलनायिकेच्या भूमिकेने देखील प्रेक्षकांचे मन जिंकले आहे.

---

## भूत बंगलाचे दिग्दर्शक प्रियदर्शन यांच्या वाढदिवसानिमित्त अक्षय कुमारने उधळली कॉमेडीची धमाल

प्रियदर्शन हे भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक चर्चेत असलेल्या दिग्दर्शकांपैकी एक असून त्यांच्या चित्रपटांनी प्रदर्शित होऊन अनेक वर्षे उलटली तरीही प्रेक्षकांच्या मनात आजही खास स्थान टिकवून ठेवले आहे. दमदार कथा आणि भरपूर मनोरंजनासाठी ओळखले जाण-ारे प्रियदर्शन सध्या त्यांच्या आगामी चित्रपट 'भूत बंगला'मुळे चर्चेत आहेत. हा हॉरर-कॉमेडी चित्रपट यंदाच्या मोठ्या आणि बहुप्रतिक्षित चित्रपटांपैकी एक मानला जात आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाच्या माध्यमातून तब्बल १४ वर्षांनंतर प्रियदर्शन आणि अक्षय कुमार ही लोकप्रिय जोडी पुन्हा एकत्र येत आहे. या चित्रपटात अक्षय कुमार मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. प्रियदर्शन आणि अक्षय कुमार यांची जोडी भारतीय सिनेमातील सर्वात आयकॉनिक दिग्दर्शक-अभिनेता जोड्यांपैकी एक मानली जाते. फिर हेरा फेरी, भूल भुलैया, भागम भाग यांसारख्या अनेक कल्ट चित्रपटांद्वारे या दोघांनी प्रेक्षकांना अविस्मरणीय मनोरंजन दिले आहे. आजही हे चित्रपट प्रेक्षकांमध्ये तितकेच लोकप्रिय आहेत. त्यामुळे भूत बंगला मधील त्यांची ही पुनर्भेट चाहत्यांमधील उत्सुकता आणखी वाढवत आहे. या चित्रपटातून त्यांच्या वर्षानुवर्षांच्या घट्ट नात्याचीही झलक पाहायला मिळणार आहे.

आज प्रियदर्शन आपला वाढदिवस साजरा करत असून, या खास दिवशी अक्षय कुमारने हा क्षण आणखी संस्मरणीय केला आहे. अक्षयने एक मजेशीर व्हिडिओ शेअर करत प्रियदर्शन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. या व्हिडिओमध्ये भूल भुलैया मधील सहकलाकार विद्या बालनही दिसत आहे. पूर्णपणे प्रियदर्शन-स्टाइल कॉमेडीने रंगलेला हा व्हिडिओ अक्षयपासून सुरू होतो, जो दिग्दर्शकाला त्यांच्या ६९व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतो आणि ही एक 'ग्रेट एज' असल्याचे म्हणतो. त्यानंतर विद्या बालन तिच्या आयकॉनिक मंजुलिका अंदाजात एंट्री घेते आणि प्रियदर्शन यांना शुभेच्छा देतानाच त्यांच्या आगामी भूत बंगला चित्रपटासाठीही शुभेच्छा व्यक्त करते. हा व्हिडिओ प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करत आहे.

हा व्हिडिओ शेअर करताना अक्षय कुमारने कॅप्शनमध्ये लिहिले, मी ओळखत असलेल्या सर्वोत्कृष्ट माणसांपैकी एकाला वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा. प्रियान सर, तुमचं येणारं वर्ष आनंदाने भरलेलं असो. वाढदिवसाच्या भूत-भूत शुभेच्छा ;) भूत बंगला ला एक संपूर्ण मनोरंजक चित्रपट बनवणारी त्याची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्याची दमदार स्टारकास्ट. या चित्रपटात अक्षय कुमार, तब्बू, परेश रावल, राजपाल यादव, जिशु सेनगुप्ता, असरानी आणि वामिका गब्बी यांसारखे इंडस्ट्रीतील लोकप्रिय आणि अनुभवी कलाकार एकत्र दिसणार आहेत. त्यामुळे प्रेक्षकांना हास्य, उत्कृष्ट अभिनय आणि जबरदस्त स्क्रीन प्रेझेन्स यांचा परिपूर्ण मिलाफ पाहायला मिळणार आहे.बालाजी टेलिफिल्म्स लिमिटेडचा विभाग असलेल्या बालाजी मोशन पिक्चर्सतर्फे, केप ऑफ गुड फिल्म्सच्या सहकार्याने भूत बंगला सादर केला जात आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, वामिका गब्बी, परेश रावल, तब्बू आणि राजपाल यादव मुख्य भूमिकांमध्ये असतील. चित्रपटाचे दिग्दर्शन प्रियदर्शन यांनी केले असून, अक्षय कुमार, शोभा कपूर आणि एकता आर कपूर यांनी त्याची निर्मिती केली आहे. भूत बंगला १५ मे २०२६ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.





## डोंट बी शायसह प्राइम व्हिडिओ आणि इटर्नल सनशाइन प्रोडक्शन्सच लँडमार्क कोलॅबोरेशन जाहीर

प्राइम व्हिडिओ ÷ इटर्नल सनशाइन प्रोडक्शन्स: रोमँटिक कॉमेडी चित्रपट ङ्गडोंट बी शायफ्मधून नव्या प्रवासाची सुरुवात

आलिया भट्ट आणि शाहीन भट्ट यांनी आपल्या इटर्नल सनशाइन प्रोडक्शन्स या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती केली आहे, तर ग्रिश्मा शाह आणि विकेश भूटानी हे सह-निर्माते आहेत. स्नीती मुखर्जी यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे.

भारताच्या सर्वाधिक लोकप्रिय एंटरटेनमेंट प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या प्राइम व्हिडिओने आज आपल्या आगामी ओरिजिनल चित्रपट ङ्गडोंट बी शायफ्ची घोषणा केली आहे. स्नीती मुखर्जी लिखित-दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती आलिया भट्ट आणि शाहीन भट्ट यांनी त्यांच्या इटर्नल सनशा-इन प्रोडक्शन्सच्या बॅनरखाली केली असून, ग्रिश्मा शाह आणि विकेश भूटानी हे सह-निर्माते आहेत. या चित्रपटाची कथा २० वर्षांच्या श्यामिली उर्फ ङ्गशायफ दासभोवती फिरते. शायला वाटते की तिचं आयुष्य पूर्णपणे नियोजनात आहे, पण अचानक आलेलं एक वळण तिचं आयुष्य पूर्णपणे बदलून टाकतं आणि सगळं तिच्या नियंत्रणाबाहेर जाऊ लागतं. प्राइम व्हिडिओ इंडियाचे डायरेक्टर आणि हेड ऑफ ओरिजिनल्स निखिल माधोक म्हणाले की, आलिया भट्ट आणि शाहीन भट्ट यांच्यासोबत ही मजेशीर पण तितकीच हृदयाला भिडणारी रोमँटिक कॉमेडी तयार करताना आम्हाला खूप आनंद होत आहे.

ङ्गशाय दासफ्सारख्या खास व्यक्तिरेखेभोवती फिरणारी ही कथा आहे. भावना, आपलेपणा आणि मनोरंजन यांचा सुंदर मिलाफ असलेली ही यंग अडल्ट स्टोरी मैत्री, प्रेम आणि मोठं होण्याच्या प्रवासाचं प्रभावी चित्रण करते. ते पुढे म्हणाले, मजबूत फीमेल-फॉरवर्ड कथा, फ्रेश, रिलेटेबल आणि मजेशीर लेखन, खरेखुरे व्यक्तिरेखांकन आणि राम संपत यांच्या संगीतमुळे ङ्गडोंट बी शायफ जगभरातील प्रेक्षकांसाठी एक सुंदर आणि लक्षात राहणारा अनुभव ठरेल, याची आम्हाला खात्री आहे.

इटर्नल सनशाइन प्रोडक्शन्सच्या सह-संस्थापक आलिया भट्ट म्हणाल्या, इटर्नल सनशाइनमध्ये आम्ही नेहमी अश्याच कथा निवडतो ज्या प्रामाणिक वाटतात आणि ज्यांचा स्वतः चा वेगळा आवाज असतो. ही फिल्म आम्हाला लगेच आवडली, कारण तिच्यात साधेपणा आहे आणि कमिंग-ऑफ-एजचा एक सुंदर दृष्टिकोन आहे. स्नीतीची ऊर्जा आणि तिचं पॅशन कथेशी आ-पोआप जुळून आलं. हा प्रोजेक्ट माझ्यासाठी आणि इटर्नल सनशाइनसाठी खूप खास आहे. प्राइम व्हिडिओसारखे पार्टनर्स मिळाले, जे निर्भीडपणे क्रिएटिव्ह निर्णय घेतात आणि वेगळ्या प्रकारच्या कथा मनापासून सपोर्ट करतात, त्यामुळे ही कथा सांगण्यासाठी हीच योग्य जागा असल्याचं आम्हाला वाटलं.





## दीपिका पादुकोणच्या समर्थनात आशुतोष राणा; म्हणाले....

वर्क शेड्यूलवर मोठी चर्चा: दीपिका पादुकोणच्या बाजूने आशुतोष राणा यांनी मांडले आपले मत

गेल्या वर्षी दीपिका पादुकोण यांनी आठ तासांच्या कामाच्या शिफ्टची केलेली मागणी चित्रपटसृष्टीत एक महत्त्वाची आणि उघड चर्चा सुरू करणारी ठरली. सुरुवातीला वैयक्तिक मत म्हणून मांडलेली ही भूमिका लवकरच संपूर्ण चित्रपटविश्वात प्रतिध्वनित झाली. अनेक अभिनेते, दिग्दर्शक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांनी सेटवर निश्चित आणि संतुलित कामाच्या तासांची गरज असल्याचे मत उघडपणे व्यक्त केले. अनेकांचे मत होते की सर्जनशीलतेवर परिणाम न करता कलाकारांचे आरोग्य आणि मानसिक स्वास्थ्य यांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने हा निर्णय फार काळापासून आवश्यक होता. ही चर्चा पुढे जात असताना आता ज्येष्ठ अभिनेते आशुतोष राणा यांनीही दीपिकाच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. एका प्रकाशनाला दिलेल्या विशेष मुलाख-तीत त्यांनी आठ तासांच्या वर्क फॉर्म्युलाचे समर्थन करताना सांगितले की, कलाकारांवर त्यांच्या शारीरिक व मानसिक क्षमतेपेक्षा अधिक ताण दिल्यास सर्जनशीलता, अभिनयाची गुणवत्ता आणि व्यावसायिक प्रामाणिकतेवर विपरीत परिणाम होतो.

आठ तासांपेक्षा अधिक काम का करू नये, याबाबत बोलताना राणा म्हणाले,, माझ्या मते सर्जनशील काम आठ तासांपलीकडे जाऊ नये. जर सर्वोत्तम परिणाम अपेक्षित असतील, तर हे समजून घेणे अत्यावश्यक आहे. आठ तासांचा कालावधी पुरेसा असतो आणि काम त्या वेळेत पूर्ण होऊ शकते. प्री-प्रोडक्शन मजबूत असेल, सर्व गोष्टी व्यवस्थित ठरलेल्या असतील आणि काय शूट करायचे आहे याची स्पष्टता असेल, तर आठ तासांतही उत्कृष्ट काम करता येते.

ते पुढे म्हणाले की, दीर्घकाळ काम केल्यास त्याचा थेट परिणाम अभिनयावर होतो, कारण ऊर्जा ही मर्यादित असते. राणा म्हणाले, आठ तासांपेक्षा जास्त वेळ काम केल्यास कामाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. हे संपूर्ण गणित ऊर्जा आणि क्षमतेचे आहे. प्रत्येक व्यक्तीकडे वीस तास काम करून उर्वरित चार तासांत स्वतःला पुन्हा ताजेतवाने करण्याची क्षमता नसते. एखाद-दोन दिवस थोडे अधिक काम करणे ठीक असू शकते, पण तेच जर सवय बनले, तर कामाच्या सादरीकरणावर परिणाम होणारच. म्हणूनच आठ तासांच्या वेळेचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

तयारीचे महत्त्व अधोरेखित करताना राणा यांनी सांगितले की अनेकदा गरज नसतानाही केवळ नियोजनाच्या अभावामुळे कामाचे तास वाढतात. ते म्हणाले, स्क्रिप्ट, सीन ब्लॉकिंग आणि नियोजनासंबंधी सर्व चर्चा कार्यालयातच व्हायला हव्यात. सेटवर पोहोचल्यानंतर 'हा सीन तर होता नाही, तो बदलूया' असे म्हणणे योग्य नाही. जहाजाचा कॅप्टन जर स्पष्ट असेल, तर आठ तासांपेक्षा जास्त काम करण्याची गरजच भासत नाही.

आधीच चित्रपटसृष्टीतील अनेकांनी दीपिका पादुकोण यांच्या संतुलित कामाच्या वेळापत्रकाच्या मागणीला पाठिंबा दिला आहे. त्यात आता आशुतोष राणा यांचा पाठिंबा मिळाल्याने ही चर्चा अधिक बळकट होत असून, शाश्वत आणि आरोग्यदायी चित्रपट निर्मितीवर लक्ष केंद्रीत होत आहे. दुसरीकडे, दीपिका पादुकोण शाहरुख खानच्या किंग आणि दिग्दर्शक ॲटली यांच्या आगामी भव्य चित्रपटासह अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये व्यस्त असून, शिस्तबद्ध कामसंस्कृती आणि मोठ्या प्रमाणावरचे सिनेमा हे एकत्र नांदू शकतात, हेच यातून स्पष्ट होते.

# भातांगळी गटात भाजपाला मताधिक्य द्या; एकही विकासाचे काम शिल्लक ठेवणार नाही-आ.कराड

## भातांगळी, ममदापूर, बोरी, मुशिराबाद येथील प्रचार बैठकांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण मतदार संघात विकास कामाच्या आधारावर भारतीय जनता पार्टीला मोठे समर्थन मिळत असून भातांगळी जिल्हा परिषद गटात तिन्ही उमेदवार बहुमताने विजयी करा. या जिल्हा परिषद गटातील कोणत्याच गावातील विकासाचे एकही काम शिल्लक ठेवणार नाही अशी ग्वाही भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी ठिकठिकाणी झालेल्या प्रचार बैठकीतून बोलताना दिली. या बैठकींना त्या त्या गावातील मतदारांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

भारतीय जनता पार्टीचे लातूर तालुक्यातील भातांगळी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार श्री. महादेव गुलाब साळुंके, भातांगळी पंस गण उमेदवार पांडुरंग अशोक बालवाड आणि बोरी पंस गणातील उमेदवार सौ. सिंधुबाई राजेंद्र खुरदळे यांच्या प्रचार निमित्ताने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी भातांगळी, ममदापूर, बोरी आणि मुशिराबाद येथे प्रचार बैठका घेऊन मतदाराशी संवाद साधला यावेळी त्यांच्या समवेत भाजपाचे तिन्ही उमेदवार, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, गोविंद नरहारे, विजयकुमार मलवाडे, वाजिद पटेल, सतीश बिराजदार, संजय ठाकूर, सुरेश पाटील, हनुमंत गव्हाणे, आदिनाथ मुळे, मारुती शिंदे, व्यंकट जटाळ, सुरेखा पुरी, रुपेश काळे, विष्णू कारवाडे, विशाल वंगवाडे, रमाकांत पाटील, चंद्रकांत पासमे, दत्तू वंगवाड, पद्माकर शिंदे, ज्ञानोबा शेळके, गणेश पासमे, राजू पासमे, महेश शिंदे, पांडुरंग कदम, अहमद शेख, अशोक बिराजदार, सुरेश हंगरगे, लिंबराज बोळंगे, विठ्ठल जटाळ, नागनाथ विटेकर, पुंडलिक बेंबडे, प्रल्हाद अनंतवाड, अशोक इंगळे, बजरंग पाटील, साहिल सुळे, ऋषिकेश ईगे, मयूर मलवाडे, भागवत बोयने, प्रदीप चित्ते यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रत्येक ठिकाणी आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रचार बैठकांना मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी भाजपा कार्यकर्त्यांसह मतदारांनी गावातील अडीअडचणीची सोडवणूक आपल्यामुळेच झाली असल्याचे सांगून आप्पा साहेबांच्या माध्यमातून गावच्या विकासाला गती मिळाली असल्याचे ठिकठिकाणी अनेकांनी बोलून दाखवले. तर शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळाला असल्याचे समाधान व्यक्त केले. ममदापूर येथील महेश सुरवसे यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला.



ठिकठिकाणच्या बैठकीतून बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, आमदार झाल्यानंतर प्रत्येक गावात जे जे विकासाची कामे करणे शक्य आहे ती सर्व कामे करण्याचा, गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न केला असून केंद्रात आणि राज्यात भाजपाच्या नेतृत्वातील सरकार असल्याने ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती भाजपाच्याच ताब्यात आली पाहिजे. भातांगळी गटातून भाजपाला मोठे समर्थन द्या निश्चितपणे या भागाला सभापती होण्याचा मान मिळू शकतो असे बोलून दाखवले.

ऊसाच्या टिपऱ्याचे राजकारण जास्त दिवस चालणार नाही, साखर कारखाने ही त्यांची जाहगिरी नसून शेतकऱ्याच्या मालकीचे आहेत येणाऱ्या वर्षभरात प्रत्येक गावातील शेत रस्ते पांदण रस्ते मजबूत करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून या निर्णयामुळे शेतकऱ्याची मोठी गैरसोय लवकरच दूर होणार असल्याचे सांगून येत्या ७ फेब्रुवारी रोजी कमळ चिन्हा समोरील बटन दाबून भातांगळी गटातील तिन्ही उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असेही आव्हान आ. रमेशआप्पा कराड यांनी ठिकठिकाणी बोलताना केले.

## मुशिराबादचे काँग्रेसचे सरपंच प्रशांत मलवाडे यांचा आ. कराड यांच्या उपस्थितीत भाजपात जाहीर प्रवेश



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील मौजे मुशिराबाद येथील काँग्रेसचे सरपंच प्रशांत विनायकराव मलवाडे यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. ऐन निवडणुकीच्या काळात या प्रवेशामुळे मुशिराबाद आणि परिसरात भाजपाची ताकद वाढली आहे. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून होत असलेल्या विविध विकास कामांना प्रेरित होऊन अनेक गावातील अनेकजण भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शुक्रवारी दुपारी लातूर तालुक्यातील मौजे मुशिराबाद येथील सरपंच प्रशांत विनायकराव मलवाडे यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिट्टी देत भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी बोरी येथील चेअरमन विजयकुमार मलवाडे, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, ज्येष्ठ मार्गदर्शक वाजिद पटेल, बापू चामले, मंडल सरचिटणीस हनुमंत गव्हाणे, भातांगळी जिल्हा परिषद गटातील भाजपाचे उमेदवार महादेव साळुंके यांच्यासह अनेक जण होते. प्रशांत मलवाडे यांच्या भाजपा पक्षप्रवेशामुळे मुशिराबाद आणि परिसरातील अनेक गावात भारतीय जनता पार्टीची ताकद वाढली असून भाजपाच्या उमेदवारांचा विजयाचा मार्ग सुककर झाला आहे.

## राजा नारायण लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये शहीद दिवस व महात्मा गांधी यांची पुण्यतिथी साजरी



**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये शहीद दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे व प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्वी यांच्या हस्ते महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजन करून शाळेतील अमर जवान स्मारकास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. ''गांधीजींनी सांगितलेल्या सत्य व अहिंसेच्या मूल्यांचा विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनामध्ये अंगीकार करावा'' असे श्री कबाडे यांनी त्यांच्या मनोगतात सांगितले. कृतज्ञ राष्ट्राच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व सर्व अमर हुतात्म्यांना मौन पाळून श्रद्धांजली वाहिली. अभयराज कोकाटे या विद्यार्थ्याने आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूहगीत सादर केले. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी शहीद झालेल्या जवानांसाठी आपल्या गीतातून श्रद्धांजली वहिनी तसेच जेवणाचे कार्य यांच्यामुळेच आपण देशात सुरक्षित राहतो म्हणून या सैनिकाचा सदैव आम्हाला गर्व आहे असे आपल्या मनोगत व्यक्त केले. या प्रस्तुत कार्यक्रमात उपस्थित अमित होनमाळे, वर्षा खुंटेगावे, मंजुषा भोसले, पूनम सूर्यवंशी, संदीप केंद्रे, दर्शन देशपांडे, मनिषा नाडे, उल्का मोरे, जस्मिन शेख, राणी भोसले, रेश्मा चव्हाण, मनिषा वराडे हे शिक्षक उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात हुतात्मा दिन संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी आज दोन मिनिट मौन (स्तब्धता) पाळून हुतात्मा दिन संपन्न झाला.

यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, डॉ. संजय गवई, डॉ. बसवेश्वर बेंद्रे, अनिल उस्तुर्गे, गोपाळ तिरुमुले, रंगनाथ लांडगे, संभाजी लातूरे, योगीराज माकणे, ओंकार बोळशेट्टे, अजय गायकवाड, गुरुप्रसाद बिराजदार आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

तसेच महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य आणि व्यवसाय अभ्यासक्रम द्वारा सुद्धा सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग दर्शविला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि जलील सय्यद यांनी परिश्रम घेतले.

## जुन्या आठवणींना उजाळा देत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था, लातूरद्वारा संचलित दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी येथे माजी विद्यार्थ्यांचा मेळावा दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण व आपुलकीच्या वातावरणात संपन्न झाला. विविध शैक्षणिक वर्षांतील माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत महाविद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. दीर्घ कालावधीनंतर पुन्हा एकत्र येण्याची संधी मिळाल्याने संपूर्ण परिसर आनंद आणि उत्साहाने भारावून गेला होता.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चाऊस वाजिद उपस्थित होते. व्यासपीठावर प्रा. अविनाश चौधरी, प्रा. माळी सुप्रिया, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष आदित्य भोसले व सचिव वैभव माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने करण्यात आली.

प्राचार्य डॉ. चाऊस वाजिद यांनी आपल्या मनोगतात माजी विद्यार्थी हे महाविद्यालयाची खरी ओळख व अभिमान असल्याचे सांगितले. माजी विद्यार्थ्यांच्या यशातून महाविद्यालयाची शैक्षणिक परंपरा व मूल्ये समाजापर्यंत पोहोचतात. माजी व विद्यमान विद्यार्थ्यांमधील संवाद महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा असून भविष्यातही माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच माजी विद्यार्थ्यांनी कनिष्ठ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य करावे, असा संदेश दिला. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी समन्वयक प्रा. अविनाश चौधरी यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व मार्गदर्शन केले. यानंतर प्राध्यापकांनी चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

या प्रसंगी माजी विद्यार्थी अभय कदम, डॉ. अमर पटेल, स्वामी सिद्धेश्वर, सादुल्ला सय्यद, फिरदोस हिप्परगे, सुदर्शन जोशी, वैभव पवार, दीपक राठोड व नंदकुमार पिटले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील करिअर संधी, स्पर्धा परीक्षा, कौशल्यविकास, व्यक्तिमत्त्व विकास, संशोधन, उद्योग, रुग्णसेवा, उच्च शिक्षण तसेच कॉर्पोरेट क्षेत्रातील संधींबाबत सखोल मार्गदर्शन केले. बदलत्या तंत्रज्ञानाचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमादरम्यान विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व उपस्थितांनी त्याचा मनसोक्त आनंद घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. फार्मसी तृतीय वर्षातील विद्यार्थिनी निकिता काळे, कल्पना कांबळे, मानसी माने, कृष्णप्रिय जाधव व विद्यार्थी मयूर रामपूरकर, तसेच डी. फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी अंकिता घोबाळे व




ऋतुजा चाटे यांनी केले. आभार प्रदर्शन माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष आदित्य भोसले यांनी केले.

या वेळी महाविद्यालयातील विद्यमान विद्यार्थी, सुमारे ६० माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, तसेच प्रा. सुषमा पांचाळ, प्रा. श्रुती अंबड, प्रा. कांचन वाघमारे यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'टीचर्स ट्रेनिंग ऑन सिक्युरिटी मार्केट' विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि सेबी सर्टिफाईड सुमन फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ''टीचर्स ट्रेनिंग ऑन सिक्युरिटी मार्केट'' या विषयावर मार्गदर्शनपर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते.

या शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सारिका लोहाना उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थित प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना गुंतवणूक, शेअर बाजार आणि विशेषतः म्युच्युअल फंड्समधील गुंतवणुकीबाबत सखोल व उपयुक्त मार्गदर्शन केले. सुरक्षित गुंतवणूक, जोखीम व्यवस्थापन व दीर्घकालीन आर्थिक नियोजन याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, बीसीए विभाग प्रमुख डॉ. शशिकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख डॉ. वैशाली सातपुते तसेच कार्यक्रमाचे मुख्य आयोजक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आकांक्षा भांजी यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. रूपा गिल्डा यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. खदीर शेख, डॉ. लक्ष्मीकांत सोनी, डॉ. प्रेमसागर मुंदडा, प्रा. लहू शेंडगे आदींनी विशेष परिश्रम घेतले. या प्रशिक्षणामुळे प्राध्यापकांना सिक्युरिटी मार्केटविषयी अद्ययावत व व्यावहारिक माहिती मिळाल्याने कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.


## चन्नबसवेश्वर फार्मसी मध्ये चेस व कॅरम विभागीय स्पर्धा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** इंटर इंजिनीअरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य -२ झोन अतर्गत व्यावसाईक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यामध्ये खेळाडू वृत्ती झोपासली जावी, याकरिता दरवर्षी विविध क्रिडा प्रकारचे आयोजन केले जाते. त्यातील चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालय लातूर येथे भव्य चेस व कॅरम विभागीय स्पर्धा दिनांक ३०/०१/२०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उदघाटन संस्थेचे सचिव भिमाशंकर देवणीकर यांच्या हस्ते,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय थोंटे, प्राचार्य डॉ विजेंद्र स्वामी एस. एम., डॉ. भुसनुरे ओ. जी. व स्पर्धेत सहभागी महाविद्यालयाच्या क्रीडा प्रशिक्षकाच्या हस्ते संपन्न झाले.

सदरील स्पर्धेत हिंगोली, नांदेड, लातूर,व परभणी जिल्यातुन चेस स्पर्धे साठी १० संघ व कॅरम स्पर्धेसाठी १० संघ सहभागी झाले. दिवसभर झालेल्या चुरशीच्या स्पर्धेमध्ये ग्रामीण टेकनिकल आणि मॅनेजमेंट कॅम्पस नांदेड हा संघ चेस व कॅरम क्रिडा प्रकारात प्रथम विजेते पद मिळवले. स्वामी विवेकानंद पॉलीटेकनिक लातूर या संघाने चेस क्रिडा प्रकारात उपविजेते ठरले. राजीव गांधी इन्स्टिटूट ऑफ पॉलीटेकनिक लातूर या संघाने कॅरम मध्ये उपविजेते पद मिळवले.

सदरील क्रिडा स्पर्धा यशश्वी संपन्न करण्यासाठी महावियालयातील स्पर्धा संयोजक प्रा रोहित कोंबडे यांनी कार्य केले. या स्पर्धाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा बस्वराज सुगावे, प्रा प्रताप भोसले, प्रा. रवी राजुरकर,प्रा. रामलिंग सुगावे, प्रा. दत्तहरी कौडेवार, प्रा. प्रशांत बनसोडे, निलंगेकर विशाल ,सिद्धेश्वर स्वामी, जाधव गोविंद, प्रमोद स्वामी व नागेश स्वामी इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यानी भुमिका निभावली व सदरील स्पर्धा उत्साही वातावरणात स्पर्धा संपन्न झाल्या.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# नृत्य, नाटक आणि शेलापागोटे कार्यक्रमाला उपस्थितांची दाद: क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांतील विजेत्यांचा सत्कार



लोहारा (प्रतिनिधी)-लोहारा शहरातील वसंतदादा पाटील हायस्कूल संलग्न नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. यानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर नृत्य, नाट्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

स्नेहसंमेलनाच्या पहिल्या दिवशी प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या उर्मिला पाटील होत्या. गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार व प्रमुख मार्गदर्शक देवा चव्हाण (बार्शी) यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुनील बहिरे यांनी केले. यावेळी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील राज्यस्तरीय व विभागीय स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच कबड्डी, क्रिकेट, गोळा फेक, थाळी फेक, धावणे आदी स्पर्धांतील विजेत्या संघांनाही गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहिल्यास खेळात प्राविण्य मिळते, असे मार्गदर्शन शिवकुमार बिराजदार यांनी केले. तर देवा चव्हाण यांनी विनोदी शैलीतून जीवनातील शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

दुसऱ्या दिवशी वार्षिक स्नेहसंमेलनाचा मुख्य सांस्कृतिक कार्यक्रम झाला. यावेळी लोहारा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सचिन केंद्रे व गटविकास अधिकारी जगदेव वग्गे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. सुनील बहिरे यांनी प्रास्ताविक करताना शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला.

यानंतर विद्यार्थ्यांच्या विविध कला-गुणदर्शन कार्यक्रमांना सुरुवात झाली. सुलोचना रसाळ व पौर्णिमा घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी पारंपरिक गीतांवर नृत्य सादर केले. महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी लेझीम सादर केली. प्रा. आर. सी. आष्टेकर व प्रा. डी. आर. साठे यांच्या मार्गदर्शनाखाली 'दारूची नशा, जीवनाची दुर्दशा' हे नाटक सादर करण्यात आले. तसेच शेलापागोटे कार्यक्रमात प्रा. सुनील बहिरे, प्रा. आर. सी. आष्टेकर, बालाजी इरुदे व प्रा. डी. आर. साठे यांनी विद्यार्थ्यांसह प्रभावी वाचन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन धनराज धनवडे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण लोहारा येथील वसंतदादा पाटील हायस्कूल व नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्या उर्मिला पाटील होत्या. गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार व मार्गदर्शक देवा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती

## बोअर मोटरीच्या केबलची अज्ञाताने केली चोरी

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी संभाजी वागंबर मुसांडे, रा. धानुरी ता. लोहारा जि. धाराशिव यांचे शेत गट नं ५५१ मधील बोरचे मोटरची केबल१४३ मिटर, टोस्विच असा एकुण २१,९५० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला.अशा मजकुराच्या फिर्यादी दिल्याने लोहारा पो ठाणे येथ गुन्हा नोंदवला आहे.

# ६६ कोटींची योजना मंजूर; नोव्हेंबरला वर्कऑर्डर देवूनही कामाची प्रतीक्षाच

# कळंब शहरासाठी जुन्या लोकसंख्येनुसार पुरवठा केल्याने अडचण

कळंब (प्रतिनिधी)-शहराची लोकसंख्या व विस्तार दिवसेंदिवस वाढत असून, लोकसंख्येनुसार पाणीपुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत कळंब शहरासाठी सुमारे ६६ कोटी रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. या योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही.

मांजरा प्रकल्पातुन कळंब शहरासह लगत असलेल्या डिकसळ गावाला पाणी पुरवठा करण्यात येतो. कालांतराने शहराची लोकसंख्या वाढल्यामुळे जिवन प्राधिकरण च्या नियमानुसार वाढीव पाणी पुरवठा करण्याकरीता शहरालगतच्या डिकसळ गावाच्या हद्दीमध्ये सन २००५ मध्ये जलशुध्दीकरण केंद्र बांधण्यात आले आहे. येथुन कळंब शहराला व डिकसळ या गावाला पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. आणि पाणी पुरवठा योजना जुन्या लोकसंख्यानुसार असल्यामुळे शहरात पाणी पुरवठा करण्यास अडचण निर्माण होत होती. दिनांक २२ जुलै २०२१ च्या सर्वसाधारण सभेत या योजनेचा ठराव मंजूर करण्यात आला होता, त्यानंतर तत्कालीन माजी नगराध्यक्ष सुवर्णा मुंडे, माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा व प्रशासकीय अधिकारी यांनी या योजनेचा परिपूर्ण प्रस्ताव बनवून महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला होता. त्यानंतर सर्व बाबींची पुर्तता झाल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सदरील पाणी पुरवठा योजनेस मान्यता दिली होती. त्यानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. महाअभियान योजनेंतर्गत कळंब शहरासाठी ६६ कोटी १० लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे. या योजनेत नवीन जॅकवेल, वाढीव वॉटर पंपसेट तसेच इतर आवश्यक बाबींचा समावेश करण्यात येणार आहे.

**लवकरच कामास सुरुवात कळंब शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन पाणीपुरवठा बळकटीकरण योजना मंजूर झालेली आहे. या योजनेची प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच कामास सुरुवात होणार आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर कळंब शहराचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेल. - सुनंदा कापसे, नगराध्यक्ष, कळंब**

वाढीव पाणीसाठा आरक्षणास मंजुरी कळंब नगरपालिकेने दिनांक २७ मार्च १९९८ रोजी मांजरा प्रकल्पातून १.४९ दलघमी पाणी आरक्षित केले होते. मात्र मागील काही वर्षांत लोकसंख्या वाढल्यामुळे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान योजनेंतर्गत वाढीव पाणी आरक्षणासाठी प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे सादर करण्यात आला. त्यानुसार जलसंपदा विभागाने शहरासाठी ०.८४६१ दलघमी अतिरिक्त पाणी आरक्षण मंजूर केले आहे. त्यामुळे एकूण कळंब नगरपालिकेसाठी २.३४ दलघमी पाणी साठा आरक्षित झाला आहे.

**दररोज २५ लाख लिटर पाणीपुरवठा :** कळंब शहरापासून सुमारे २३ किलोमीटर अंतरावर धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून पाइपलाइनद्वारे शहराला पाणीपुरवठा केला जातो. सध्या सुमारे ३० हजार लोकसंख्येनुसार जीवन प्राधिकरणाच्या नियमानुसार दररोज २५ लाख लिटर पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र शहराचा विस्तार व लोकसंख्या वाढ लक्षात घेता भविष्यातील गरजांसाठी नगरोत्थान अभियानांतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. त्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

# अवैध मद्य विरोधी कारवाई

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अनिता रा.कल्पना नगर पारधीपीडी कळंब ह.मु. धान्य गोडावूनचे समोर कळंब ता. कळंब जि. धाराशिव या दि.२८.०१.२०२६ रोजी आपल्या पत्र्याचे शेडसमोर अंदाजे ७,२०० किंमतीची ८० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर विलास रा.पारधी वस्ती ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२८.०१.२०२६ रोजी पारधी वस्ती पाथर्डी येथे अंदाजे ४,००० किंमतीची ४०लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत अनिता रा.तुळजापूर नाका धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.२८.०१.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोरील पत्र्याचे शेडमध्ये अंदाजे ४,५०० किंमतीची ४५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत अश्रुकांत रा.खामसवाडी ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२८.०१.२०२६ रोजी हॉटेलसहारा पाईमागील बाजूस खामसवाडी येथे अंदाजे १,०४० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २६ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.


लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## निवडणूक काळातील मार्गदर्शक सूचना जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक - २०२६

# आदर्श आचारसंहिता : काय करावे व काय करू नये

### काय करावे

चालू असलेले कार्यक्रम / योजना पुढे सुरू ठेवता येतील.यासंदर्भात शंका निर्माण होईल अशा बाबींसाठी राज्य निवडणूक आयोग /जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण अथवा मान्यता प्राप्त करून घ्यावी. पूर,अवर्षण,साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साहाय्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना सुरू करता येतील.तसेच या संदर्भात सुरू असलेल्या योजना पुढे सुरू ठेवता येतील.मरणासन्न किंवा गंभीररीत्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे कार्य समुचित मान्यतेने पुढे सुरू ठेवता येईल.मैदानांसारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना / निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी नि:पक्षपातीपणे उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना / उमेदवारांना हेलिपॅडचा वापरही नि:पक्षपातीपणे उपलब्ध करून दिला पाहिजे.

विश्रामगृहे,डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने याबाबत निवडणूक आयोग व शासनाने काढलेल्या आदेशांचे संपूर्ण पालन करून,सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर उपलब्ध करून देणे अनुज्ञेय असल्यास तसे करावे.इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवारांवर करण्यात येणारी टीका ही केवळ त्यांच्या धोरणे, कार्यक्रम,पूर्वीची कामगिरी व पार पाडलेली कामे यापुरतीच मर्यादित असावी.

शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे.प्रस्तावित सभेची जागा व वेळ याबाबत स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना संपूर्ण माहिती देऊन आवश्यक त्या सर्व परवानग्या प्राप्त कराव्यात.प्रस्तावित सभेच्या जागी निबंधात्मक अथवा प्रतिबंधक आदेश जारी असतील तर त्यांचे संपूर्ण पालन करावे. आवश्यक असल्यास सवलतीसाठी अर्ज करून ती सवलत वेळेत प्राप्त करावी. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिक्षेपक (Loudspeaker) किंवा इतर सवलतींचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी घेणे आवश्यक आहे.

सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर प्रतिबंध घालण्यासाठी पोलीसांचे सहकार्य घ्यावे. कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभ वेळ व जागा,मिरवणूक ज्या मार्गाने जाणार आहे तो मार्ग तसेच मिरवणूक समाप्त होण्याची वेळ व जागा आगाऊ निश्चित करून पोलीस प्राधिकाऱ्यांकडून परवानगी घ्यावी. मिरवणूक ज्या वस्तीमधून जाणार आहे,त्या ठिकाणी लागू असलेल्या कोणत्याही प्रतिबंधात्मक आदेशांची खात्री करून त्यांचे पालन करावे. तसेच सर्व वाहतूक नियमांचे पालन करावे.

मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये.ज्यांचा क्षेपक किंवा हत्यार म्हणून गैरवापर होऊ शकतो अशा कोणत्याही वस्तू मिरवणुकीत सहभागी व्यक्तींनी बाळगू नयेत.मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेत पार पडावे यासाठी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य करावे.उमेदवार व त्यांचे अधिकृत कार्यकर्ते यांनी विहित परवानगी घेऊन निवडणूक प्रशासनाकडून ओळखपत्रे व बिल्ले प्राप्त करून ती दर्शनी भागावर लावावीत.मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात व त्यावर कोणतेही चिन्ह,उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव नमूद नसावे.मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापराबाबत लागू असलेल्या निर्बंधांचे पूर्णपणे पालन करावे.

राज्य निवडणूक आयोग,जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांचे वैध प्राधिकारपत्र असल्याशिवाय कोणालाही मतदान कक्षात प्रवेश देण्यात येऊ नये.मुख्यमंत्री,मंत्री, खासदार,आमदार यांनाही यामध्ये सूट नाही.निवडणूक प्रक्रियेतील कोणतीही तक्रार किंवा समस्या निवडणूक निर्णय अधिकारी,क्षेत्र/प्रभाग दंडाधिकारी किंवा नियुक्त निरीक्षकांच्या निदर्शनास आणावी.

राज्य निवडणूक आयोग,जिल्हाधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या सर्व आदेश,निर्देश व सूचनांचे काटेकोर पालन करावे.

### काय करू नये

शासकीय वाहने,कर्मचारी किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारासाठी वापर करू नये.यामध्ये केंद्र व राज्य शासन, सार्वजनिक उपक्रम,स्थानिक स्वराज्य संस्था,महानगरपालिका,नगर परिषद, सहकारी संस्था,जिल्हा परिषद,पंचायत समिती,ग्रामपंचायत तसेच सार्वजनिक निधी गुंतवलेल्या सर्व संस्थांचा समावेश आहे.

सत्ताधारी पक्ष किंवा शासनाने साध्य केलेल्या उद्दिष्टांबाबत सरकारी खर्चातून जाहिराती देऊ नयेत. कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषणा करणे,कोनशिला बसवणे,नवीन रस्ते किंवा इतर विकासकामांची आश्वासने देणे टाळावे.शासन किंवा सार्वजनिक उपक्रमांमध्ये कोणत्याही प्रकारच्या तात्पुरत्या (AdAhoc) नियुक्त्या करू नयेत.मंत्री (राज्यमंत्री व उपमंत्रीसह) हे उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्ष किंवा मतमोजणीच्या ठिकाणी प्रवेश करता येणार नाही.

निवडणूक प्रचारासोबत कोणतेही सरकारी कामकाज पार पाडू नये.मतदारांना आर्थिक किंवा अन्य कोणतेही प्रलोभन देऊ नये.मतदारांच्या जातीय किंवा धार्मिक भावनांना आवाहन करू नये. जाती, जमाती,धर्म किंवा भाषिक गटांमध्ये तेढ,वैमनस्य किंवा तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये.इतर पक्षांच्या नेत्यांच्या किंवा कार्यकर्त्यांच्या खाजगी जीवनावर टीका करू नये.

पडताळणी न केलेले आरोप किंवा विकृत स्वरूपात टीका करू नये.निवडणूक प्रचार,भाषणे,फलक,संगीत इत्यादींसाठी कोणत्याही प्रार्थनास्थळाचा वापर करू नये.लाच देणे,दबाव टाकणे,धाकदपटशा, खोट्या नावाने मतदान करणे किंवा मतदारांना ने-आण करणे यासारख्या भ्रष्ट प्रथा प्रतिबंधित आहेत.निषेध व्यक्त करण्यासाठी कोणाच्याही घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरू नयेत.

कोणत्याही व्यक्तीच्या मालकीच्या जमिनी,इमारती,भिंती इत्यादींचा परवानगीशिवाय वापर करू नये.इतर पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या सभा व मिरवणुकांमध्ये अडथळा निर्माण करू नये.एका पक्षाची सभा सुरू असलेल्या ठिकाणी दुसऱ्या पक्षाने मिरवणूक काढू नये.इतर पक्षांनी लावलेली प्रचार सामग्री काढून टाकू नये.आक्षेप असल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी.

**मतदानाच्या दिवशी मतदान कक्षाजवळ किंवा ओळखचिठ्ठी वाटपाच्या ठिकाणी कोणतेही प्रचार साहित्य प्रदर्शित करू नये.**

ध्वनिक्षेपकांचा वापर सकाळी ६ पूर्वी किंवा रात्री १० नंतर तसेच लेखी परवानगीशिवाय करू नये.The Noise Pollution (Regulation and Control) Rules,2000 चे काटेकोर पालन करावे.सार्वजनिक सभा, मिरवणूक किंवा प्रचारफेरीत ध्वनिक्षेपकांचा वापर केवळ लेखी परवानगीनेच करावा.रात्री १० नंतर सभा सुरू ठेवण्यास परवानगी नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करावे.निवडणूक काळात पैशांचे,मद्याचे किंवा वस्तूंचे वाटप करू नये.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649